# स्वकुळ समाचार

www.swakulsamachar.com

ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज १९८२

वर्ष १२ वे, अंक ०२ रा, मार्च - एप्रिल २०२६, ठाणे, पाने -४०




फक्त सभासदांकरीता

## सर्व समाजबांधवांना होळी, महिलादिन, गुढीपाडवा आणि रामनवमीच्या हार्दीक शुभेच्छा!













**ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ साळी समाज उल्हासनगर आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिर**

**(वाघमारे हॉल, उल्हासनगर रविवार दि. २२/ फेब्रुवारी २०२६)**



॥ जय श्री कृष्ण ॥ ॥ जय श्री कृष्ण ॥ ॥ जय श्री कृष्ण ॥ ॥ जय श्री कृष्ण ॥ ॥ जय श्री कृष्ण ॥ ॥ जय श्री कृष्ण ॥ ॥ जय श्री कृष्ण ॥

॥ श्री गणेशाय नमः ॥



नमिला गणपती माऊली सारजा ॥
आता गुरुराजा दंडवत ॥
-श्री तुकाराम महाराज

॥ संत ज्ञानेश्वर प्रसन्न ॥



केवल्याचा पुतळा । प्रगटला भूतळा।
चैतन्याचा जिव्हाळ । ज्ञानोबा माझा ॥
-श्री एकनाथ महाराज

॥ श्री विठ्ठल रखुमाई प्रसन्न ॥




वारे यारे लहान थोर । थांती भलते नारीनर ॥
करावा विचार । नलगे चिंता कोणाची ॥

॥ भगवान परशुराम प्रसन्न ॥




खांद्यावर कुऱ्हाड, हातात तलवार ।
असा आमचा परशुराम अवतारी ॥

॥ श्री तुकाराम महाराज ॥



सकळासी येथे आहे अधिकार
कली युगी उध्दार हरिच्या नामे ॥

॥ श्री जिव्हेश्वर प्रसन्न ॥



शिवसुत भगवान श्री जिव्हेश्वर
एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ ॥



श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारी ॥
हे नाथ नारायण वासुदेवा ॥

अधिक जेष्ठ प्रतिपदा शु.१ रविवार १७/०५/२०२६ ते अधिक जेष्ठ शु.९ रविवार २५/०५/२०२६ पर्यंत
ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली शिंदे (बी.ई.सिव्हिल) आळंदी यांच्या अमृत तुल्यवाणीने
प्रारंभ होणार आहे. तरी भक्तगणांनी श्रवण सुखाचा लाभ घ्यावा.

॥ सकळ मंगल निधी । श्री विठ्ठलाचे नाम आधी ॥ ज्ञा. म. ॥ ॥ गीता भागवत करिती श्रवण । अखंड चिंतन विठोबाचे ॥ तु. म. ॥

## ॥ श्री विठोबा रखुमाई मंदिर स्वकुळ साळी समाज, पेठमाप-चिपळूण आयोजित ॥

# संगीत श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ सप्ताह, पेठमाप-चिपळूण

**भागवत कथा प्रवक्ते : ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली शिंदे (B.E. Civil), आळंदी**

## जन्मांतरे भवेपुण्यं तदा भागवतं लभते !

भगवान श्री परशुरामांच्या पुण्य भूमित्त ग्रामदैवत श्री करंजेश्वरी देवीच्या कृपाआशिर्वादाने वाशिष्ठी नदीच्या रम्य तिरावरती स्वकुळ साळी समाजाच्या श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात भव्य सुशोभित मंडपात होणार आहे.तरी सर्व भाविकांना कळविण्यात आनंद वाटतो की, दुःख निवृत्ती व सुखप्राप्ती करून देणारी, सर्व भयातून, संकटातून, रोगातून, दारिद्रयातून भूत पिशाच्च भितीतून जन्ममरणातून मुक्त करणारी भागवत कथा आहे.भागवत कृपेने संत आशिर्वादाने आई-वडिल भाऊ यांच्या पुण्याईने उध्दारार्थ संगीत श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ सप्ताह आयोजित केलेला आहे. सदर कार्यक्रमाकरीता गुणजन मंडळी येणार आहे.तरी या सुवर्ण संधीचा भाविकांनी अवश्य लाभ घ्यावा. हि नम्र विनंती.



आमचे प्रेरणास्थान
कै. ह.भ.प. सदानंद महादेव दुर्गुळे (भिवंडी)

प्रारंभ : रविवार दि.१७ मे २०२६

## -दैनंदिन कार्यक्रम-

सांगता : रविवार दि.२४ मे २०२६


| सकाळी ६ ते ७ | सकाळी ८ ते ९ | सायंकाळी ५ ते ६ | रात्रौ ६.३० ते ९.३० |
|---|---|---|---|
| काकडा आरती | महापुजा | हरिपाठ | भागवत कथा |



स्वानंद सुख निवासी जोग महाराज

| वार | दिनांक | श्रीमद भागवत कथा विषय |
|---|---|---|
| रविवार | १७/०५/२०२६ | श्री गणेश पूजन, कलश पूजन, नवग्रह पूजन, ग्रंथ पूजन नंतर विणापूजन, तुळस पूजन, ध्वज पुजन, श्रीमद भागवत महात्म्य, गोकर्ण आख्यान, भागवत विधी फल |
| सोमवार | १८/०५/२०२६ | भक्त चरित्र, नारद व्यास, उत्तरा, कुन्ती, भीष्माचार्य, ध्यान विधी, चतुःश्लोकी भागवत, सृष्टी उत्पत्ती वर्णन, विदुर चरित्र |
| मंगळवार | १९/०५/२०२६ | कपील गीता, सति चरित्र, ध्रुव चरित्र, जडभरत चरित्र, नाममहिमा, वत्रासुर कथा |
| बुधवार | २०/०५/२०२६ | प्रल्हाद चरित्र, गजेंद्र मोक्ष, समुद्र मंथन कथा, वामन अवतार, श्रीराम जन्म, कृष्ण जन्मोत्सव |
| गुरुवार | २१/०५/२०२६ | श्रीकृष्ण बाल लिला, वृंदावन लिला, कालीयामर्दन लिला |
| शुक्रवार | २२/०५/२०२६ | वेणू वादन, यज्ञपत्नी उध्दार, गोवर्धन लिला, रासलिला, कंसवध, रुक्मीणी स्वयंवर कथा |
| शनिवार | २३/०५/२०२६ | द्वारकेतील श्रीकृष्ण लिला, सुदाम चरित्र, परिक्षीती मोक्ष, दत्तात्रयांचे २४ गुरु |
| रविवार | २४/०५/२०२६ | काल्याचे किर्तन: सकाळी ९ ते ११ वा. व महाप्रसाद दु. १२ ते ३ पर्यंत |

## भागवत कथा प्रवक्ते



अध्यापक जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था आळंदी
**ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली शिंदे**
B.E.Civil आळंदी

**अधिक मासानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी विवाह सोहळा सोमवार दिनांक २५/०५/२०२६ रोजी होईल.**

महाप्रसाद दुपारी १.०० ते ३.००

| | |
|---|---|
| संगीत सहकार्य | अण्णासाहेब वाबरे (आळंदी) |
| सिंथेसाईजर | माऊली झोंबडे (आळंदी) |
| तबला | केदार चोपडे (आळंदी) |
| बासरी | अभिनय महाराज (आळंदी) |
| टाळ | ओंकार महाराज (आळंदी) |

सहकार्य

श्री विठ्ठल वारकरी सांप्रदायीक मंडळ, गोवळकोट ह.भ.प.श्री बांद्रे महाराज, ह.भ.प.श्री भैरवकर महाराज

टिप :सदर कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार आयोजकांनी राखून ठेवला आहे.

**आयोजक व कार्यक्रमाचे स्थळ: श्री विठोबा रखुमाई मंदिर स्वकुळ साळी समाज पेठमाप, चिपळूण, जि. रत्नागिरी**

या सर्व कार्यक्रमांना सर्व जनता जनार्दनांनी उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही नम्र विनंती.

**प्रफुल्ल विष्णू तांबडे**
अध्यक्ष
श्री विठोबा रखुमाई मंदिर स्वकुळ साळी समाज, पेठमाप-चिपळूण

**विजय गोविंद वैद्य**
मार्गदर्शक
भागवत सप्ताह उत्सव कमिटी

**उमेश सितारास काटकर**
अध्यक्ष
भागवत सप्ताह उत्सव कमिटी

॥ जय श्री कृष्ण ॥ ॥ जय श्री कृष्ण ॥ ॥ जय श्री कृष्ण ॥ ॥ जय श्री कृष्ण ॥ ॥ जय श्री कृष्ण ॥ ॥ जय श्री कृष्ण ॥ ॥ जय श्री कृष्ण ॥

# लायन श्री. चंद्रकांतजी हावरे साहेब



## ७९ व्या वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा




## २० फेब्रुवारी

अध्यक्ष-स्वकुळ साळी ज्ञातीगृह श्रीक्षेत्र आळंदी,
माजी सचिव-अ. महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज
माजी सहसचिव - अ. भा. स्व. साळी समाज संस्था (विणकर)
सल्लागार-रायगड जि. स्व. सा, सेवा मंडळ,
अधिकृत प्रतिनिधी-स्वकुळ समाचार.
हितचिंतक-श्री गणेश ट्रस्ट, रानवली.

---



## श्री. सोमनाथ कासटकर साहेबांना ७१ व्या वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा

जन्म. दि. २१ फेब्रुवारी १९५५

HAPPY Birthday!

अध्यक्ष : श्री सुर्यवंशी समस्त स्वकुळ साळी
स्थानिक पंच मंडळ ट्रस्ट (श्री विठ्ठल मंदिर) एरंडोल जि. जळगांव
अध्यक्ष : महासभा एरंडोल मो. ९८२०८२१७२६
माजी अध्यक्ष : अखिल महाराष्ट्र स्व.सा.स. संस्था.
सल्लागार: ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज.
माजी अध्यक्ष, ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज.
माजी संपादक, स्वकुळ समाचार.
सल्लागर, श्री गणेश मंदीर ट्रस्ट, रानवली.

: शुभेच्छूक :

सौ. शैलजा सो. कासटकर आणि परीवार व सर्व आप्तेष्ट
ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज,
एरंडोल साळी समाज व महासभा एरंडोल

---

## ७२ व्या वाढदिवसा निमित्त



हार्दिक शुभेच्छा

श्री. प्रभाकर गणेश साळी (डहाके)
सेवानिवृत्त - डेप्युटी जनरल मॅनेजर
(बी.एस.एन.एल.)
Mob. : 9423891101/9421568222

शुभेच्छुक

समस्त डहाके, कापरे,
कासटकर, खर्डीकर, धुले, लोखंडे, धरम,
दातरंगे, केंदोळे, शेंद्रे परिवार व सर्व आप्तेष्ट
आणि ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व
महासभा एरंडोल तर्फे वाढदिवसाच्या
खूप खूपशुभेच्छा !

रिजन्सी सर्व्हम, बिल्डींग नं. ५, फ्लॅट नं. ५०२, गणपती मंदिर रोड,
टिटवाळा (पूर्व), ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१ ६०५

# माघी श्री गणेशात्सव, रानवली - २०२६ कार्यक्रम क्षणचित्रे















अखिल भारत स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त
अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त
ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित
नोंदणी क्र. ई / ९२८ / ठाणे दि. १७/०५/८८

# स्वकुळ समाचार

RNI No. MAHMAR/2014/57230

कार्यालय : फ्लॅट नं. ०१, साईसेवा नं. २ को. ऑप. हौ. सोसा.,
जन. अरुण कुमार वैद्य चौक, गांधीनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व) जि. ठाणे ४२१२०१

अध्यक्ष : सौ. शैलजा सोमनाथ कासटकर मो. ९८२०१४५४५१
अधिष्ठान, प्लॉट नं. सी-वन, निवारा हौसिंग सोसायटी, स्टार कॉलनीजवळ, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व), जि. ठाणे - ४२१ २०४

| | | |
|---|---|---|
| सचिव | : ॲड, सोनाली अरविंद दाहोत्रे | मो. ९८६७१७०५०७ |
| सहसचिव | : श्री. महेश खंडू कापरे | मो. ९८२१२५१९७३ |
| उपाध्यक्ष | : सौ. संगिता उदयकुमार साळी | मो. ८३०८७००३५० |
| उपाध्यक्ष | : श्री. देवेन पुष्पलाल क्षिरसागर | मो. ९३२०६१४५७३ |
| कोषाध्यक्ष | : डॉ. श्री. किसन जगन्नाथ जेधे | मो. ९८३३८२०६०१ |
| सहकोषाध्यक्ष | : श्री. स्नेहल भरत एडके | मो. ९२२०९१९८९७ |

संपादक : श्री. ईश्वरलाल एकनाथ साळी (फंड)
बी-३०४, छन्नुर भवन सहकारी गृहनिर्माण संस्था,
जी. गुप्ते रोड, विष्णूनगर, डोंबिवली (प)
मो. ८६५२२१५१६३

| | | |
|---|---|---|
| सहसंपादक | : श्री. शिवाजीराव सदाशिव आमते | मो. ९०९६४०३८०० |
| | श्री. राजेश शंकरराव साळी | मो. ९९६७५८४०३२ |
| | श्री. सचिन किसन शिवदास | मो. ९३२४२२३५१७ |
| वेब डिझायनर | : श्री. बाळकृष्ण साळी, सुरत | मो. ९०३३६०३६१३ |

अंतर्गत हिशोब तपासणीस : श्री. बारसू रामदास सिताफळे

## सल्लागार

| | | |
|---|---|---|
| | : श्री. सोमनाथ रतिलाल कासटकर | मो. ९८२०८२१७२६ |
| | : श्री. भालचंद्र नेमिचंद साळी | मो. ९७०२६४४२३२ |
| आर्थिक | : श्री. नितिन ढवण (सीए) | मो. ९८२२४५६७६६ |
| | : श्री. उदयकुमार लालचंद साळी | मो. ९३२३३८६१३९ |
| | : श्री. बाळकृष्ण ओंकार आढाव | मो. ९७५७०८६९१५ |
| कायदेशीर | : ॲड. श्री. गजानन सदाशिव घटे | मो. ९८३३५२७१२२ |

**या अंकात व्यक्त केलेल्या मताविषयी संपादक सहमत असतातच असे नाही ... संपादक**

**पत्रव्यवहार व लेखन साहित्य पाठविण्यासाठी :-**
E-mail : sampadakswakulsamachar@gmail.com
Website : www.swakulsamachar.com

## अधिकृत प्रतिनिधी

१) श्री. अशोक शिवदास साळी, सुरत ९९०९६०१९७०
२) श्री. पंडित माधवराव साळी, एरंडोल ९४२३३४३८३०
३) श्री. बाळकृष्ण मारुतीराव डंबरे, बडोदा ९४२६०२५११४
४) श्री. विजय गोविंद वैद्य, चिपळूण ९०२१५६४०२८
५) श्री. चंद्रकांत आत्माराम हावरे, नाहूर ८७७९१७२९८६
६) श्री विलास बाबुराव सरोदे, औरंगाबाद ९४२१४३१७३३

**नविन अधिकृत प्रतिनिधींच्या नियुक्ती साठी अर्ज मागविण्यात येत आहे.** - १) प्रतिनिधीचे वय २१ ते ७० या दरम्यान असावे. तसे ते स्थानिक संस्थेचे सभासद असावेत. २) स्वकुळ समाचारसाठी जास्त वेळ देणारे तसेच नविन सभासद, जाहिरात, देणगी, इमारतनिधी आणि आपल्या विभागातील कार्यक्रमाचे वृतांत तात्काळ देणारे असावेत. ३) संस्थेबद्दल आस्था असणारे सुशिक्षित व संस्थेसाठी तन, तन, धन अर्पण करणारे असावेत.

**जाहिरातीचे दर -** रंगीत पूर्ण पान रु.६,०००/- साधे पूर्ण पान रु.१,२००/- साधे पावपान रु.५००/-
रंगीत अर्धेपान रु.३,०००/- साधे अर्धेपान रु.६००/-

वृतांतामधील कृष्ण धवल पासपोर्ट साईज फोटो प्रोसेसिंगकरीता रु. १००/- जाहिरातीसोबत पाठवावे. (फोटोची इमेज चांगली हवी.)

**साळी समाजातील सर्व सभासदांना नम्र विनंती आहे की आपण आपले सभासत्वाचे नुतनिकरण करुन घ्यावे ही नम्र विनंती.**

## नविन दर खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | नवीन सभासद वर्गणी (पाच वर्षाकरिता) | रु. १,०००/- |
| २) | उपवर वधू नोंदणी वर्गणी | |
| | ०३ अंकासाठी | रु. ४५०/- |
| | ०६ अंकासाठी | रु. ९००/- |
| | १२ अंकासाठी | रु. १,५००/- |
| ३) | विश्वस्त निधी | रु. १,५००/- |
| ४) | आधारस्तंभ (स्मृतीपुष्प) | रु. १,५००/- |
| ५) | पृष्ठदान | रु. १५,०००/- |
| ६) | मंगल निधी. | रु. ५००/- |

वर दिलेले सर्व पेमेंट खालील अकाउंट नंबरला **NEFT/RTGS/IMPS/UPI** तसेच **QR CODE** ने पाठवू शकता. पेमेंट पाठविल्याचा स्क्रीन शॉट ९४२२६८६८५५ या व्हाट्सअप नंबरवर पाठविण्यास विसरु नये सोबत आपला फुल पोस्टल ॲड्रेस पिनकोड सह व मोबाईल नंबर पाठवावा म्हणजे आपणास आपली रिसिट आपल्या मोबाईलच्या व्हाट्सअपवर त्वरित पाठविण्यात येईल, सहकार्य असावे.

| | |
|---|---|
| **Favouring** | **: SWAKUL SAMACHAR** |
| **BANK NAME** | **: DOMBIVLI NAGARI SAHAKARI BANK** |
| **BRANCH** | **: NANDIVALI ROAD DOMBIVLI (EAST)** |
| **IFSC CODE** | **: DNSB0000009** |
| **ACCOUNT NUMBER** | **: 009010100002199** |

आपले विनीत
संपादक स्वकुळ समाचार

---

## स्वकुळ समाचारचे पंचवार्षिक नविन सभासदांचे हार्दिक स्वागत!

| सभासदांचे नाव | पावती क्रमांक | दिनांक | सभासद क्रमांक |
|---|---|---|---|
| १) प्रो. डॉ. श्री. जितेंद्र के साळी | ७०९/१४६ | ०४/०१/२०२६ | ३१०१०१ |
| २) श्री. रमाकांत काशिनाथ डाहोरे | ७०९/१४६ | ०४/०१/२०२६ | ३१०१०२ |
| ३) श्री. महेशकुमार हिरामण अहिरराव | ७०९/१४९ | २२/०१/२०२६ | ३१०१०३ |
| ५) श्री. अभय प्रभाकर पाटेकर | ७०९/१५१ | ०२/०२/२०२६ | ३१०२०१ |
| ६) श्री. सुधीर पी सांगळे | ७०९/१५३ | ०२/०२/२०२६ | ३१०२०२ |
| ७) सौ.सुषमा विनोद गोंगे | ७०९/१५४ | ०६/०२/२०२६ | ३१०२०३ |
| ८) श्री. अनंत विठोबा काटकर | ७०९/१६६ | २६/०२/२०२६ | ३१०२०४ |
| ९) श्री. दिलीप राधाकिशन सांगळे | | ०१/०३/२०२६ | ०१०३०१ |
| १०)श्री. वैभव रमेश ढोरे | | ०१/०३/२०२६ | ०१०३०२ |
| ११) श्री. मनोज अशोक उपरे | | ०१/०३/२०२६ | ०१०३०३ |

## जागतिक महिला दिन मेळावा २०२६

ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ साळी समाज, कल्याण आयोजित जागतिक महिला दिन मेळावा दि.०८ मार्च २०२६ रविवार रोजी सकाळी १० ते दुपारी ०३ वाजेपर्यंत आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमात महिला,पुरुष, डॉक्टर व वकील यांचा सत्कार करण्यात येणार आहे तरी समाज-बंधू यांनी उपस्थित राहावे ही विनंती. स्थळ : जिव्हेश्वर भवन, कल्याण स्वकुळ साळी समाज, पारनाका, कल्याण (पश्चिम) संपर्क : सौ. शरयु पाठक मो. 9867927963



# संपादकीय

नमस्कार जय जिव्हेश्वर सर्वप्रथम स्वकुळ समाचारचे सर्व सभासद, समाज बंधू भगिनी, वाचक वृंद, सर्व पदाधिकारी, सल्लागार, हितचिंतक, जाहिरातदार या सर्वांना होळी, धुलिवंदन, रंगपंचमी, गुढीपाडवा व रामनवमी या सर्व सणांच्या त्याचप्रमाणे हिंदू नववर्षाच्या ईश्वरलाल साळी (फंड) संपादक, स्वकुळ समाचारतर्फे हार्दिक शुभेच्छा. स्वत ःची काळजी घ्या, सणांचा आनंद घ्या. ही सदिच्छा.

सध्याचे युग म्हणजे डिजिटल युग. आजकाल सर्वच गोष्टींचे डिजिटलायजेशन झालेले आहे तर मग आपणच मागे का ? सध्याची आपली मुख्य समस्या म्हणजे पोस्टाद्वारे पाठविलेले स्वकुळ समाचार अंक प्राप्त न होणे किंवा वेळेवर न मिळणे अशा परिस्थितीत सभासदांनी आपल्या स्वत ःमधे बदल करणे गरजेचे आहे आणि नविन परिस्थितीचा स्विकार करायला हवा. तात्पर्य या सर्व गोष्टींचा सारासार विचार करता स्वकुळ समाचारच्या सर्व सभासदांना आपला स्वकुळ समाचार अंक पोस्टाने पाठविला जाणार असून त्याशिवाय आपल्या व्हॉट्सअपवर अंक **पीडीएफ** स्वरुपात पाठविला जाईल त्याचप्रमाणे www.swakulsamachar.com या स्वकुळ समाचारच्या वेबसाईटवरही अंक उपलब्ध करुन दिलेला आहे. त्या वेबसाईटचा आपण पुरेपूर उपयोग करून त्याचा आपण सर्व सभासदांनी लाभ घ्यावा. या वेबसाईटवर आपणास सर्व अंक उपलब्ध असतील.

ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार आयोजित बरेचसे उपक्रम असतात त्याची माहिती वेळोवेळी ग्रुपवर पाठवली जाते.आता नुकताच या.२२/०२/२०२६ रविवार रोजी सर्व समाजाला संपूर्ण मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सर्वांना मोफत औषधीचेही वाटप करण्यात आले. या शिबिराचा जवळ जवळ २५० समाज-बांधवांनी लाभ घेतला. या शिबिरात पॅथालॉजी यात Random Blood Sugar, SPO2, Blood Pressure, BMI, ECG या सर्व तपासण्या, Eye Check Up यात (मोतीबिंदू, रेटिना, डोळ्यांचा दाब, मोफत चष्मे वाटप इत्यादी), दंत तपासणी, हाडांची घनता (बोन डेन्सिटी), कोलेस्ट्रॉल नियंत्रणासाठी व शुगर रिव्हर्सलसाठी आहार तज्ज्ञांकडून विशेष समुपदेशन व आहार मार्गदर्शन या सर्व सेवा पूर्णपणे मोफत देण्यात आल्या व त्याचा आपल्या समाज बांधवांनी पुरेपूर फायदा करून घेतला. त्याचप्रमाणे ०८मार्च २०२६ रविवार रोजी जागतिक महिला दिवस साजरा केला जाणार आहे. त्यात जे सेवा देत आहे असे पुरुष महिला डॉक्टर, वकील यांचा विशेष सत्कार केला जाणार आहे. तसेच वासंतिक मेळावा ही दर वर्षी साजरा केला जातो. अशा या कार्यक्रमात लहानांपासून मोठ्यांपर्यंत स्टेज परफॉर्मन्स कसा करता येईल याची संधी दिली जाते, मान्यवरांचे सत्कार, ज्येष्ठ नागरिकांचाही सत्कार करण्यात येतो असे विविध प्रकारचे कार्यक्रम ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज राबवित असतो त्यासाठी आम्हाला सर्व समाज बांधवांची मदत सुद्धा हवी असते हि मदत शारिरीक आर्थिक स्वरूपातही असू शकते तरी आपण दानरूपाने मदत करू शकतात अशा या मदतीने आपण हे विविध कार्यक्रमांचे आयोजन करीत असतो, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करीत असतो, पारितोषिके देत असतो तसेच वैद्यकीय मदतही करीत असतो.

सर्व समाज बांधवांना आम्ही आव्हान करतो की त्यांनी ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित स्वकुळ समाचारचे पंचवार्षिक सभासद रु.१०००/- भरून सभासद व्हावे.आपल्या कुटुंबातील स्वर्गवासी व्यक्तीच्या स्मरणार्थ आधारस्तंभ निधी म्हणून रु.१५००/- ची देणगी दिल्यास त्यांचे नाव स्वकुळ समाचार अंकात कायमस्वरूपी छापण्यात येइल. विश्वस्त निधी, इमारत निधीसाठी सुद्धा आपण दान देऊ शकतात. अंकासाठी जे काही साहित्य पाठवायचे असेल त्यासाठी आपण ८६५२२१५१६३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा धन्यवाद

**संपादक :** श्री.ईश्वरलाल साळी (फंड)

**स्वकुळ समाचार मासिक ठाणे जिल्ह्यातर्फे प्रकाशित करण्यात येणारे नोंदणीकृत सामाजिक पत्रिका असून या मासिकात प्रसिद्ध करण्यात आलेले लेख, जाहिरात, वधूवर जाहिरात, इतर कोणतेही लेखन साहित्य व जाहिराती यांची सत्यता आणि कायदेशीर बाबी आम्ही तपासून पहात नाही, त्या मताशी संपादक व संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही, स्वत: सत्यता तपासल्याशिवाय व्यवहार करू नये. नुकसानीसाठी संपादक अथवा संपादक मंडळ जबाबदार असणार नाही याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज महिला मेळावा, आळंदी वृत्तांत



दि.२४ व २५ डिसेंबर रोजी स्वकुळसाळी ज्ञातीगृह आळंदी येथे मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी बुधवार दिनांक २४/१२/२०२५ रोजी संपूर्ण देशभरातून आंध्र प्रदेश, तेलंगना, कर्नाटक ,गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्र या राज्यातून अनेक महिला मंडळ व महिला सहभागी झाल्या होत्या.

ठाणे जिल्ह्या अंतर्गत बदलापूर मधून - सौ. विद्या खुस्तुले, सौ. मनिषा देवकर, सौ. उर्मिला पिंगटे, सौ. रुपाली पाटणकर, सौ. पौर्णिमा घुंद्रे, सौ. शारदा कोकाटे व सौ. श्रद्धा साळी आणि ठाणे, डोंबिवली, कल्याण, अंबरनाथहून अश्या एकूण २० जणी या कार्यक्रमात सहभागी झाल्या होतो. मेळाव्या स्थानी सर्वाच्या निवासाची व जेवणाची उत्तम सोय स्थानिक अध्यक्षांनी केली होती.

२४ तारखेला दुपारी ३.३० वाजता प्रतिनिधींची नोंदणी करण्यात आली.

सायंकाळी ६.०० वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली. हुबळी येथील जिव्हेश्वर महिला मंडळाने इशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर जिव्हेश्वर महिला मंडळ पुणे यांनी गणपती स्तवन केले.

वेगवेगळ्या राज्यातून आलेल्या महिला मंडळांचा परिचय व स्वागत सत्कार करण्यात आले. ७.३० वाजता वेगवेगळ्या राज्यातून आलेल्या महिला मंडळांनी सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला. कार्यक्रम फारच बहारदार झाला आणि यात प्रामुख्याने गणपती नृत्य, कृष्णनृत्य ,देवीचा गोंधळ, स्त्री आधारित गीत, दांडिया रास, गरबा ,दादा कोंडके यांच्या गीतांवर नृत्य, गवळण, जनपद गीते असे बहारदार कार्यक्रम झाले. तसेच स्त्री आरोग्याबद्दल माहिती देण्यात आली.

ठाणे जिल्ह्यातर्फे कुळगाव बदलापूर महिला मंडळानी सध्याची सामाजिक समस्या म्हणजे करिअरच्या मागे धावणारी पिढी व त्यातून निर्माण झालेल्या विवाह समस्या यावर प्रकाश टाकणारी लघु नाटिका **"यंदा कर्तव्य आहेच"** बदलापूर भगिनींनी सादर केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता साळी, प्रेमा क्षिरसागर, सुरेखा भंडारे व नेहा कल्याणी यांनी केले.

सूत्रसंचालन मराठी,तेलगू व कन्नड या भाषांमध्ये करण्यात आले.रात्रीच्या भोजनानंतर पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

**दिवस दुसरा : २५ डिसेंबर सत्र दुसरे** : सकाळी ठीक ८.०० वाजता अल्पोपहार झाल्यानंतर ९.३० वाजता कार्यक्रमाची सुरुवात झाली. व्यासपीठावर अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज महिला ट्रस्ट अध्यक्षा सौ. शशिकला चौधरी, महासचिव सौ. विद्या शिरसागर, कोषाध्यक्षा सौ. गीता एकबोटे यांच्याबरोबर प्रमुख पाहुणे म्हणून सन्माननीय श्री. रमेश चिल्लाळ, (अध्यक्ष अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज)

**श्री. चंद्रकांत हावरे**, अध्यक्ष (स्वकुळ साळी ज्ञातीगृह आळंदी) रामलिंगेश्वर कांबळे, अध्यक्ष (स्वकुळ साळी समाज तेलंगणा राज्य)

**डॉ. अशोक दांडेकर**, अध्यक्ष (अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज) **सौ स्वाती लंगोटे**, ज्येष्ठ अधिवक्त्या औरंगाबाद, डॉ. सौ. विनूता सव्वाशेरे कर्नाटक यांची उपस्थिती होती.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते जिव्हेश्वर पूजन व आरती



करण्यात आली. अरुणा चिल्लाळ यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. **अंकिनी महिला मंडळाने** श्लोक, वंदे मातरम हे **राष्ट्रगीत** जिव्हेश्वर महिला मंडळ दावणगिरी यांनी म्हटले. स्वागतपर भाषण सचिव विद्या क्षिरसागर यांनी केले. सर्व प्रमुख पाहुण्यांचा सन्मान व सत्कार करण्यात आला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. **सौ.स्वाती लंगोटे** यांनी कायदेविषयक माहिती दिली व समाजातील वाढते घटस्फोटाचे प्रमाण यावर चिंता व्यक्त केली. ज्योतिषतज्ञ सौ. विनुता सव्वाशेरे यांनी पंतप्रधान योजनांची माहिती दिली. श्री बलराम धोत्रे यांनी रिसर्च विषयी माहिती दिली. शरीराला आवश्यक असलेले व्हिटॅमिन सी, व्हीटॅमिन डी ३ व बी १२ यावर रिसर्च करून निर्माण केलेल्या औषधाविषयी माहिती दिली. कोरोना काळात ज्या शिक्षकांनी ऑनलाइन वर्ग घेतले अशा शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. महिला संगीत, बाल संगीत, चित्रकला या कलांचा समावेश होता. कार्यक्रमासाठी सढळहस्ते मदत करणाऱ्या देणगीदारांचाही सन्मान व सत्कार करण्यात आला.

त्यानंतर अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज महिला मंडळ व प्रतिनिधी यांचा सत्कार करण्यात आला.

**चर्चासत्र :-** या सत्रामध्ये विषय १) स्वकुळ साळी समाजातील महिला समृद्ध, शिक्षित, सुसंस्कृत व प्रगतीशील होण्यासाठी अखिल भारतीय स्वकुळ साळी महिला समाजाला काय करता येईल यावर चर्चा करण्यात आली. त्यात प्रामुख्याने व्यवसायाविषयी जनजागृती, प्रशिक्षण, बाजारपेठ, आधुनिक काळाबरोबर चालण्यासाठी भाषा समृद्ध हवी. महिलांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाले पाहिजे हे मुद्दे मांडण्यात आले. २) कुटुंब संरक्षण व वृद्धांचे संरक्षण. ३) महिला उद्योजकांचे सक्षमीकरण. ४) समाजातील वाढते घटस्फोट कुटुंब संस्था व विवाह संस्काराची परंपरा. ५)अखिल भारतीय स्वकुळ साळी महिला मंडळातून दहा टक्के निधी मिळण्याबाबत अशा विषयावर चर्चा करण्यात आली. अध्यक्षांचे मनोगत झाल्यावर, सचिवांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. ह्या दुसऱ्या दिवसाचे सूत्रसंचालन - सौ श्रध्दा साळी, सौ प्रतीक्षा बोर्डे, सौ स्मिता गायकवाड, व श्रीमती सपना एकबोटे यांनी केले.

ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज अध्यक्ष सौ. शैलजा कासटकर व जिल्हा महिला मंडळ अध्यक्षा सौ. सुनिता पांढरपट्टे यांनी आमची जाण्याची व येण्याची उत्तम सोय केली त्याबद्दल पुर्ण टीमचे मनापासून धन्यवाद.

**वृत्तांकन :** सौ विद्या खुस्तुले, बदलापूर.

---

# भोपाल हलदी कुम कुम वृत्तांत

भोपाल : समाज की महिला मंडल समितीने हर्ष और उल्हास के साथ उपस्थित सभी महिलाओ को प्रति वर्ष की तरह एक दुसरे को हलदी कुमकुम लगाकर तिलगुल वितरित किया गया और समाज की ओर से प्रत्येक महिलाओं को गिफ्ट प्रदान किये गये ६ सभी उल्लासीत महिलाओने "तिळगुळ घ्या गोड गोड बोला" जोरदार नारा दिया महिलाओ के इस पावन कार्यक्रम मे एक दुसरे के प्रति स्नेह अपनापन और समाज की निस्वार्थ भाव से सेवा की झलक दिखाई दी

**८ मार्च - जागतिक महिला दिनाच्या सर्वांना शुभेच्छा. चला तर स्वकुळ समाचारचे पंचवार्षिक सभासद होऊ या.**

# स्वकुल साळी समाज अंबरनाथ हळदी कुंकू कार्यक्रम वृतांत



**अंबरनाथ हळदी कुंकू कार्यक्रम वृतांत :-** स्वकुळ साळी समाज अंबरनाथ तर्फे मकर संक्रांत स्नेह मेळावा व हळदी कुंकू समारंभ आपल्या समाज मंदिराच्या पटांगणावर दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात श्री जिव्हेश्वर भगवान पूजा व आरतीने करण्यात आली. महिलांनी वाण व तिळ गूळ देऊन हळदी कुंकू समारंभ साजरा केला. प्रमुख पाहुणे म्हणुन सौ. श्रद्धा साळी व विशेष उपस्थिती श्रीमती मनोरमा शशिकांत टपळे तसेच सौ. संगिता उदयकुमार साळी उपाध्याक्षा, ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज स्वकुळ समाचारचे संपादक श्री. ईश्वरलाल फंड, ठाणे जिल्हा स्वकुळ समाज संस्थेचे माजी अध्यक्ष श्री. उदयकुमार साळी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात महिलांच्या खेळाने झाली. त्यात स्ट्रॉ ने थर्माकोलचे बॉल ओढून दुसऱ्या ग्लास मधे जमा करायचे. त्यात सर्वच महिलांनी उस्फूर्त पणे सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक सौ. कल्पना साळी (फंड) यांनी पटकावला. त्याच बरोबर गाण्यांचा बहारदार कार्यक्रम श्री उदयकुमार साळी, श्री शशीकांत सोनवणे, श्री ईश्वरलाल साळी, श्री भारत थोरात, सौ श्रद्धा साळी, सौ साक्षी हरवंदे, सौ मानसी दुर्गळे, सौ अमृता साळी यांनी सादर केला.

यानंतर उखाणे घेण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये सुद्धा सर्व महिलांनी तसेच पुरुषांनी भाग घेतला. स्पर्धेत प्रथम क्रमांक श्रीमती निलीमा वाझट व द्वितीय क्रमांक सौ. उर्वशी बडकस यांनी पटकावला.

कार्यक्रमामध्ये आयोजित कराओके गायन स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक श्री शशीकांत सोनवणे तसेच द्वितीय क्रमांक सौ मानसी दुर्गळे यांनी पटकावला. तसेच, उत्तेजनार्थ पारितोषक सौ. साक्षी हरवंदे आणि सौ. मानसी दुर्गळे यांनी पटकावले. विशेष वेशभूषा स्पर्धेत सौ. संगीता जेधे यांना पारितोषिक देण्यात आले.

श्री महादेव ढोकळे यांनी ओबीसी जनगणनेबद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर लहान मुलांच्या हस्ते लकी ड्रॉचे बक्षीस काढण्यात आले. लकी ड्रॉ मधील बक्षीसे, श्री उदयकुमार साळी, सौ श्रद्धा साळी, सौ संगीता जेधे, सौ रेखा सरोदे, श्री शशिकांत सोनवणे, श्री किरण चोपारे, सौ सुवर्णा मंद्रे यांच्या भाग्याला आले. सदर मकर संक्रांत कार्यक्रमाचे सौ अमृता साळी यांनी उत्तम पद्धतीने सूत्रसंचालन केले व त्यानंतर श्री भारत थोरात यांनी सर्वांचे आभार प्रकट करून सर्वांनी स्नेहभोजनाचा आनंद घेतला.

अशा रीतीने सर्व समाज बांधव व भगिनींच्या सहभागाने व भरघोस उपस्थितीने हा सुंदर कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

**वृत्त संकलन :** ॲडव्होकेट श्री. भारत थोरात. सचिव, स्वकुळ साळी समाज, अंबरनाथ





कै. महादेव बाळा दुर्गुळे व कै. सदानंद महादेव दुर्गुळे, कुडली यांचे स्मरणार्थ
सौ. शारदा सदानंद दुर्गुळे व श्री. महेश सदानंद दुर्गुळे (भिवंडी) यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

**बदलापूर हळदी कुंकू वृत्तांत**

**स्वकुळ साळी समाज बदलापूर हळदी कुंकू वृतांत**.

एक रम्य पहाट.
महिलांनी गजबजलेली वादळवाट.
सोनेरी क्षणाची एक आठवण.
अनुभवाची गोड साठवण.
खळखळ निर्मळ वाहणारी सरिता.
अतुट शब्दांनी गुंफलेली कविता.
जाणिवेच्या पलीकडे, जगा वेगळं गाव.
यालाच तर आहे "हळदीकुंकू कार्यक्रम" हे नाव

जिव्हेश्वर महिला मंडळ बदलापूर यांचा हळदी कुंकू कार्यक्रम दिनांक १७/०१/२६ रोजी सायंकाळी ५ ते ८ दरम्यान सौ संगीता धमके यांच्या निवासस्थानी साजरा करण्यात आला. .दिप प्रज्वलन झाल्यावर,भगवान श्री जिव्हेश्वर व माता-अंकिनी, माता दशांकीनी यांच्या प्रतिमापूजन व आरतीने या कार्यक्रमाची सुरुवात झाली. महिलांनी हळदी कुंकू व वाण म्हणून छोटीशी भेट देण्यात आली . गप्पागोष्टी, हास्यविनोदाने व उखाणे घेऊन हा कार्यक्रम बहारदार झाला. महिला कितीही संसारात रमलेली असली तरी उखाण्यात जेव्हा ती नवऱ्याचं नाव घेते तेव्हा त्यात पारंपरिक दागिने, महावस्त्र पैठणीला मान असतोच. तसेच त्याला माहेर सासरची सुरेख किनार असते. माहेरच्या गोड आठवणी व माहेरच्या माणसासाठी तिचे मन हळवे होते हे उखाणे घेताना जाणवत होते. असा हा बहारदार कार्यक्रम उत्साहात साजरा झाला.

आभार प्रदर्शन अध्यक्ष सौ वैशाली कढेकर यांनी केले व अशा प्रकारे कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी समाज भगिनी सौ संगीता धमके,सौ रोहिणी फंड यांचे विशेष सहाय्य लाभले.अल्पोपहारची व्यवस्था सौ संगीता धमके यांनी केली त्यांचे विशेष आभार

**वृत्तांकन** : सौ विद्या खुस्तले.

**सुरत शिवदर्शन विभाग हळदी कुंकू**

**वृत्तांत :-** शिवदर्शन विभाग महिला मंडळ अध्यक्षा सौ. ऊषाबाई अशोक वाव्हळ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महीला मंडळ च्या सहकार्याने हळदी कुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला त्या कार्यक्रमात विभागीय महिला अध्यक्ष यांची उपस्थिती होती कार्यक्रमाची सुरुवात श्री जिव्हेश्वर दीप पुजन व आरती करून करण्यात आली. गृहिणी सदैव घर परीवारात व दैनिक कार्यात व्यस्त असतात तरी पण या कार्यक्रमात महिलांनी वेळात वेळ काढून विविध खेळ आणि संगीत, नृत्य कार्यक्रमात महिलांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला व कार्यक्रम सफल केला. संपूर्ण महिला मंडळ यांना मानाचा मुजरा.

---

**स्वकुळ साळी समाज मुलुंड हळदी कुंकू कार्यक्रम**

**वृतांत :-** दिनांक १८/०१/२०२६ रोजी स्वकुळ साळी समाज सेवामंडळातर्फे मकरसंक्रांत मेळावा उसफुर्त पणे रुची हॉटेल हॉल येथे संपन्न झाला. नेहमीच्या प्रथेप्रमाणे प्रथम भगवान श्री जिव्हेवरांचे पूजन झाले. नंतर सर्व जमलेल्या समाजबांबधवांचे स्वागत व अभिनंदन करण्यात आले. थोड्याच वेळात करमणुकीचे कार्यक्रम सुरू करण्यात आले. जसजसे समाजबांधव उस्फुर्त प्रतिसाद देत होते तसतशी कार्यक्रमाची रंगत वाढत गेली. महिलांची उपस्थिती जास्त प्रमाणात होती. नविन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. नवीन कार्यकारणी महिलाची असणार असे सर्वानूमते ठरले. सात महिलांची निवड करण्यात आली. समाज बांधवानी एकत्र जमण्याचा लाभ घेतला, गप्पा मारल्या, नंतर स्नेहभोजन झाले व कार्यक्रमाची सांगता आली. साधारण साठ समाजबांधवाच्या उपस्थितीत फारच उस्फुर्त पूर्ण कार्यक्रम झाला. सचिव भालचंद्र साळी व श्री विजयकुमार साळी यांनी सुत्रसंचालन केले व नंतर अध्यक्ष सुधीर सांगळे यांनी सर्वांचे आभार मानले.

# अभिनंदन



**बदलापूर :-** आपल्या समाजातील बदलापूर स्थित सुप्रसिद्ध गायिका गानकोकिळा सौ. वैदेही आणि श्री. विकास वखारे यांचे सुपुत्र वेदांता हा **MASTERS IN GLOBAL ECONOMICS**, हे उच्च शिक्षण घेण्यासाठी **Florence Itly** येथे रवाना झालेला आहे. वेदांताचे मनापासून खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा.

**घाटकोपर :-** आपल्या सर्वांचे मार्गदर्शक आदरणीय समाजसेवक श्री. भरतजी मते साहेब यांच्या सौभाग्यवती



आदरणीय अश्विनीताई भरत मते अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्था महिला अध्यक्षा, चांदिवली विधानसभा संघटिका, माजी समाज कार्य सम्राट, असल्फा व्हिलेज, घाटकोपर मुंबई येथील सौ.अश्विनीताई भरत मते या भरघोस मतांनी विजयी झाल्या त्यांचे ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार परिवारातर्फे खूप खूप अभिनंदन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

**सोलापूर :-** नवनिर्वाचित नगरसेविका सौ. कलावती गदगे सोलापूर - करलीनगर येथील नवनिर्वाचित नगरसेविका, समाजभगिनी सौ. कलावती गदगे भरघोस



मतांनी निवडून आल्या बद्दल त्यांचे ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार परिवारातर्फे खूप खूप अभिनंदन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा. वृत्तांकन- नंदू सपार, सोलापूर

मोबा. : ९९२३०३३७८६

**इचलकरंजी :-** महानगरपालिकामध्ये आपले समाज





बांधव माननीय श्री राजू संभाजी बोंद्रे हे नगरसेवक पदी मोठ्या मताधिक्याने विजयी झाले त्यांचे ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार परिवारातर्फे खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा.

**अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्था** कोषाध्यक्ष अनिल भागवत यांची सुकन्या काव्या हीच्या



अप्रतिम गोलंदाजीच्या जोरावर मुंबई संघाने १५ वर्षांखालील मुलींच्या संघाने महाराष्ट्र मुलींच्या संघास पॉडेचरी येथील एक दिवसीय क्रिकेट सामन्यात ३ विकेट राखुन सामना जिंकला व चषकावर क्रिकेट इतिहासात आपले नाव पहिल्यांदा कोरले. या उज्ज्वल यशाबद्दल कु. काव्याचे व अनिल भागवत परिवाराच्या अविरत परिश्रमाचे ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार परिवारातर्फे खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा.

**परभणी :-** जिल्ह्यातील जिंतूर पोलिस स्टेशन येथे




कार्यरत असलेले श्री. गजेंद्र सरोदे (पोलिस निरिक्षक) यांना उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्याबद्दल प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले साळी समाजाला निश्चितच अभिमानास्पद अशी बाब आहे त्याबद्दल ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार परिवारातर्फे खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा

# अभिनंदन



**संगमनेर :- Dy. SP** निलम वाव्हळ येथील आपले समाज बांधव कै. श्री. दत्तात्रय ठाणेकर यांची कन्या सौ. निलम वाव्हळ या ठाणे येथे डी.वाय.एस.पी म्हणून कार्यरत आहेत, त्यांच्या पोलिस दलातील अतुलनीय कामगिरीची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना आज ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पोलिस दलातील मानाचा राष्ट्रपती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. साळी समाजाला निश्चितच अभिमानास्पद अशी कामगिरी सौ. निलम हिने केली आहे. साळी समाजाला आपला अभिमान आहे त्याबद्दल ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार परिवारातर्फे खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा वृत्त संकलन विष्णू निचळ अध्यक्ष, साळी समाज पिंपरी चिंचवड

**अंबरनाथ :-** श्री कृष्ण वाझट यांची नात कु. महिका



वाझट हिने नॅशनल स्पोर्ट्स चॅम्पियनशिप २०२५-२६ पाँडेचेरी येथे झालेल्या डान्स स्पर्धेत उत्कृष्ट डान्स केल्याबद्दल गोल्ड मेडेल मिळाले त्याबद्दल ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार परिवारातर्फे खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा

**यावल :-** साळी समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते प्रा. नंदन




वळींकर सर (शिरसाड/यावल) यांचा थोरला चिरंजीव डॉ. हर्षित नुकताच रशिया येथून MBBS परीक्षा उत्तीर्ण होऊन भारतात मेडिकलची प्रॅक्टीस करण्यासाठी व परदेशातून पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना अत्यावश्यक असलेली FMGE परीक्षा प्रथम प्रयत्नात घवघवीत यश संपादन करून उत्तीर्ण झाल्याबद्दल संपूर्ण साळी समाजाच्यावतीने तसेच ठाणे जिल्हा स्वकूळ साळी समाजाच्यावतीने तसेच ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार परिवारातर्फे मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन

**एरंडोल :- वाढदिवस अभिष्टचिंतन** सौ. क्षमाताई



आणि श्री. दत्तात्रय नथ्थुलाल वैद्य दोघांना लग्नाच्या वाढदिवसाच्या खुप खुप शुभेच्छा आपले भावी आयुष्य सुखमय, निरामय आनंददायी जावो हीच सदिच्छा आपले शुभेच्छुक ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार सर्व पदाधिकारी

**सोलापूर :-** येथील १७ नगरसेवक विजयी झाल्याबद्दल सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या निवडणुकीत भाजपाच्या वतीने सर्वाधिक १७ पद्मशाली समाजातील सर्व विजयी उमेदवारांचे मन:पूर्वक अभिनंदन व पुढील कार्यकाळासाठी हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

**मा. श्री. डॉ. अजय पोन्नम, मा. श्री. विनायक कोंडयाल, मा. श्री. प्रथमेश कोठे, मा. श्री. मेघनाथ येमूल, मा. श्री. व्यंकटेश कोंडी, मा. श्री. श्री. शेखर इगे, मा. श्री. सत्यनारायण गुर्रम, मा. श्री. विजय चिप्पा, मा. श्री. सतीश सिरसुल्ला, मा. श्री. सिद्धेश्वर कमटम, मा. श्री. प्रशांत पल्ली, मा. सौ. श्रीकांचना यन्नम, मा. सौ. कविता गज्जम, मा. अर्चना वडनाल, मा. सौ. स्वाती बडगू, मा. सौ. दिपीका यलदंडी, मा. सौ. उज्वला दासरी**

या सर्व पद्मशाली समाज बांधवांचे ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संस्था व स्वकुळ समाचार परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन.

**शुभेच्छूक :** अशोक इंदापूरे

# " पूर्वीचा काळ"

पूर्वीचा काळ बाबा, खरंच होता चांगला,
साधे घरं साधी माणसं, कुठे होता बंगला ?
घरं जरी साधेच पण, माणसं होती मायाळू,
साधी राहणी चटणी भाकरी, देवभोळी अन श्रद्धाळू.
सख्खे काय चुलत काय, सगळेच आपले वाटायचे,
सुख असो दु:ख असो, आपुलकीने भेटायचे.
पाहुणा दारात दिसला की, खूपच आनंद व्हायचा हो,
हसून खेळून गप्पा मारून, शीण निघून जायचां हो.
श्रीमंती जरी नसली तरी, एकट कधी वाटलं नाही,
खिसे फाटके असले तरीही, कोणतंच काम थांबलं नाही.
उसनं पासनं करायचे पण, पोटभर खाऊ घालायचे,
पैसे आडके नव्हते तरीही, मन मोकळं बोलायचे.
कणकेच्या उपम्या सोबत, गुळाचा शिरा हटायचा,
पत्रावळ जरी असली तरी, पाट, तांब्या मिळायचा.
लपाछपी पळापळी, बिन पैशाचे खेळ हो,
कुणीच कुठे बिझी नव्हते, होता वेळच वेळ हो.
चिरंबंदी वाडे सुद्धा, खळखळून हसायचे,
निवांत गप्पा मारीत माणसं, ओसरीवर बसायचे.
सुख शांती समाधान "ते" आता कुठे दिसते का ?
पॉश पॉश घरा मधे, "तशी" मैफिल सजते का ?
नाते गोते घट्ट होते, किंमत होती माणसाला,
प्रेमामुळे चव होती, अंगणातल्या फणसाला,
तुम्हीच सांगा नात्या मध्ये, राहिला आहे का राम ?
भावाकडे बहिणीचा हो, असतो का मुक्काम ?
सख्खे भाऊ सख्ख्या बहिणी, कुणीच कुणाला बोलत नाही,
मृदंगाच्या ताला वरती, गाव आता का डोलत नाही.
प्रेम, माया, आपुलकी हे, शब्द आम्हाला गावतील का ?
बैठकीतल्या सतरंजीवर, पुन्हा पाहुणे मावतील का ?
तुटक तुसडे वागण्यामुळे, मजा आता कमी झाली,
श्रीकृष्णाच्या महाला मधुनी, सुदामाची सुट्टी झाली.

**सौ. सुनिता साळी (डोंबिवली)**

# साळी समाज मत - मतांतरे

धागा धागा श्रद्धेचा - स्वकुळ साळी समाजाची आध्यात्मिक विण स्वकुळ साळी समाजाचा इतिहास म्हणजे कष्टांनी विणलेली आणि श्रद्धेने झळाळणारी जीवनाची चादर आहे. या समाजाचे आराध्य दैवत भगवान श्री जिव्हेश्वर आणि माता अंकीनी दशांकीनी केवळ देवता नाहीत तर पिढ्यानपिढ्या जगण्याची दिशा देणारी आधारस्तंभ आहे. पूर्वीच्या काळी या समाजातील माणसं गरीब होती, साधी होती, पण त्यांच्या हातात हातमाग होता आणि मनात अपार श्रद्धा होती. मागावर बसून विणले जाणारे कापड हे केवळ वस्त्र नव्हते तर ते त्यांच्या जीवन तत्त्वज्ञानाचे प्रतीक होते. प्रत्येक धागा विणताना ओठावर एकच नाम घोळत असे. विठ्ठल विठ्ठल विठ्ठल ते म्हणत "**धागा धागा अखंड विणूया. विठ्ठल विठ्ठल मुखी म्हणूया**" गरीबी होती, अडचणी होत्या, उपासतापास होते पण मनात कधी तक्रार नव्हती कारण त्यांना ठाऊक होते. "**एक धागा सुखाचा, शंभर धागे दु:खाचे, जर तारी हे वस्त्र मानवा तुझ्या आयुष्याचे**." हात मागावर विणताना बोटाला जखम होत होती, डोळे थकत होते, पाठ वाकली होती. पण श्रद्धा कधीही वाकली नाही. कारण श्री जिव्हेश्वर भगवान हेच त्यांचे बळ होते. या समाजातील माणसांनी कधी वैभव मागितले नाही. त्यांनी फक्त प्रामाणिक श्रम मागितले. विणलेल्या कापडासारखे त्यांचे जीवन साधे, मजबूत,आणि उपयोगी होतं. मागाचा आवाज जणू नामस्मरणाचा नाद होता. आज काळ बदलला आहे. हातमाग कमी झाले आहेत. पण स्वकुळ साळी समाजाची विण अजूनही तुटलेली नाही ती घट्ट आहे. कारण ती विण फक्त धाग्याची नसून श्रद्धा, कष्ट, संस्कार, आणि ईश्वर भक्तीची आहे. जोपर्यंत श्री जिव्हेश्वर भगवंताचे स्मरण, अंकीनी दशांकीनी मातेची कृपा आणि कष्टाला देव मानणारी या समाजाच्या रक्तात वाहते आहे. तोपर्यंत स्वकुळ साळी समाजाचा हा अध्यात्मिक वस्त्रकाठ कधीही फाटणार नाही.

**प्रकाश आंबुर्ले, चिपळूण. सदन. मो. न.**
८४४६२३००१०

कै. सौ. पार्वती शंकर वैद्य (आई), कै. श्री. शंकर नारायण वैद्य (वडिल) दाभोळ, कै. सौ. उषा रामदास वैद्य (नाशिक)[१०]
यांच्या स्मरणार्थ श्री. रामदास शंकर वैद्य (नाशिक) व श्री. गजानन शंकर वैद्य, ठाणे यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

# किमया इन्फोटेकच्या उद्यमी लता काकू ( अमृत महोत्सवी वाढदिवस )

"जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी" याचा प्रत्यय आमच्या लता काकूंकडे पाहिला की येतो. ममत्व, कर्तुत्व, दातृत्व जिच्या ठाई ठाई आहे असे एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणजे पुणे येथील श्रीमती लता कृष्णात एकबोटे दि. ०९ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांचा ७५ वा वाढदिवस पुणे येथे स्वकुळ साळी समाजाच्या विणकर सभागृहात पार पडला. ऐनवेळी वाढदिवस करण्याचे ठरले पण घरातील सर्व नातेवाईक नाशिक, ठाणे, तळेगाव येथून जमले घरातील शंभर एक नातेवाईकांसमवेत सुंदर सा घरगुती समारंभ नेटका पण मनाला खूप भावला .मोठेपणाचा कोठेही दिखावा नव्हता, भावगीत ,भक्तीगीत यांची सुरेल महफिल, ७५ दिव्यांनी काकूंचे औक्षण, आमच्या कुमुद ताईने बनवलेल्या हातांनी, बनवलेल्या सुंदर फुलांनी सत्कार आणि स्नेहभोजन असा छोटासा कार्यक्रम खूपच दिमाखात संपन्न झाला. आमच्या काकू या पूर्वाश्रमीच्या राऊत त्यांचा विवाह १९६८ मधे झाला .माझे काका कृष्णात एकबोटे हे भारत फोर्ज मध्ये नोकरीला होते. गुरुवार पेठेत छोट्याशा खोलीत त्यांचा संसार छान चालू होता. राजेश, मंगेश या दोन मुलांसह सुखी संसार सुरू होता.

माझे काका हे विनामूल्य आपल्या समाजातील उपवर मुला मुलींचे विवाह जमवत त्यामुळे घरात सर्वांची वर्दळ असे. काकूंनी त्यांना खंबीर साथ दिली. परंतु मुळातच जिद्दी आणि सतत व्यस्त राहण्याची सवय त्यामुळे काहीतरी व्यवसाय करावा असे त्यांना वाटे मग त्यांनी घरच्या घरी पापड करण्याचा व्यवसाय १९७८ ला सुरू केला. तो त्यांनी समर्थपणे इतका वाढवला की रोज ८० ते १०० किलो पापड नुसते करायचे नाही तर त्याचे मार्केटिंग देखील ते त्या करायच्या. व्यवसाय करताना सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न त्यांचा नेहमीच असे हे सर्व पापड त्या आपल्याच समाजातील ६० ते ७० स्त्रियांकडून करून घेत म्हणजे त्यांनी ६० ते ७० स्त्रियांना रोजगार दिला.

आपला संसार, दोन मुलांचा अभ्यास आणि भाग्यलक्ष्मी पापडाचा उद्योग त्यांनी लीलया पेलला .पुढील पंधरा वर्षे त्यांनी हा व्यवसाय यशस्वीपणे केला. त्याला साथ मिळाली ती मेहनती अशा घरकाम करणाऱ्या हिराबाईंची **जुने धागे अतूट असतात ते नव्याला बळकटी देतात** राजेश, मंगेश ही त्यांची दोनही मुले १९९३ मधे कॉम्प्युटर इंजिनिअर झाल्यावर त्यांनीही उद्योगाचा वारसा वेगळ्या स्वरूपात चालवला. त्यांनी १९९४ मधे किमया इन्फोटेक ही कंपनी स्थापन केली. या दोन्ही संगणक अभियंत्यांनी आपल्या जिद्द आणि मेहनतीने त्यांच्या प्रॉडक्ट्सचा ठसा भारतातच नव्हे परदेशातही उमटवला. टांझानिया, केनिया, झिंबाब्वे, फिलिपाईन्स, व्हिएतनाम कंबोडिया, नेपाळ बांगलादेश येथेही त्यांचे क्लायंट्स् आहेत. त्यांच्या कंपनीत कोअर बँकिंग सिस्टीम आणि पेमेंट डोमेन मध्ये डिजिटल पेमेंट साठी लागणारी प्रॉडक्ट्स् तसेच एटीएम साठी लागणारे सॉफ्टवेअर क्रेडिट कार्ड डेबिट कार्ड वॉलेट मॅनेजमेंट सिस्टीम क्रेडिट कार्ड प्रोसेसिंग अशी सर्व प्रॉडक्ट्स् इतरांचे टूल्स न वापरता संपूर्ण स्वत:च्या टेक्नॉलॉजीवर बनविले आहेत.

किमया इन्फोटेकची ही किमया माझे दोन्ही बंधू राजेश, मंगेश तसेच त्यांचे सुपुत्र व कन्या परम, सागर, तेजस आणि मैत्रेयी या इंजिनियर्सनी केली आहे आमच्या रूपा वहिनी आणि दीपा वहिनी यांची खंबीर साथ तर त्यांना असतेच पण त्या देखील Acupuncture Treatment यशस्वी पणे करतात. असे हे उद्यमी एकबोटे कुटुंब स्वार्थ कमी पण परमार्थ जास्त करण्यात धन्यता मानते. आज त्यांच्या कंपनीत १०० जण काम करतात .पुणे सोलापूर या आपल्या समाज मंडळांना ते नियमित देणगी स्वरूपात रक्कम देऊन सामाजिक बांधिलकी जपतात .आजही आमच्या लता काकू दुपारी बारा ते रात्री आठ पर्यंत रोज कंपनीत जातात. जातीने हजर राहून देखरेख आणि मार्गदर्शन करतात अशा या आदरणीय मातेस शतायुष्य लाभो हीच जिव्हेश्वर चरणी प्रार्थना !

ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार परिवारातर्फे लता काकूंना ७५ व्या वाढदिवसाच्या खूप साऱ्या शुभेच्छा.

**वृत्तांकन :** प्रा. डॉ. संध्या सु. वैद्य माजी अध्यक्षा ठाणे

## भावपूर्ण श्रद्धांजली

**कल्याण** - कै. गं. भा. नलिनी विष्णू लहाने यांचे ता. ११/१०/२०२५ रोजी वयाच्या ७७ व्या वर्षी निधन झाले.

**कळवा** - कै. श्रीमती कमल काशिनाथ सातपुते यांचे ता. १७/१२/२०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

**अंबरनाथ** - कै. दिगंबर लालचंद भागवत यांचे ता. २६/१२/२०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन.

**एरंडोल** - कै. गंगाधर दत्तात्रय दिवटे यांचे ता.०३/०१/२०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन

**कोल्हार** - येथील स्त्री रोग तज्ञ डॉ. रमेश व्हावळ यांचे थोरले बंधू सेवानिवृत्त नायब तहसिलदार कै. भास्कर राधाकिसन वाव्हळ यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी ता. ०५/०१/२०२६ रोजी निधन झाले.

**बदलापूर** - कै. श्री. अभिषेक विष्णू कुराडे यांचे ता. ०६/०१/२०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

**छत्रपती संभाजीनगर** - कै. श्री. कृष्णकांत नारायणराव धावने यांचे ता. ११/०१/२०२६ रोजी वयाच्या ८१ व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले.

**भुसावळ** - कै. श्री. भागवत भावडू वाढे यांचे ता. १५/०१/२०२६ रोजी निधन झाले.

**लिंबायत उधना** - कै. श्री. मनोहर मोतीलाल कुऱ्हे यांचे ता. १७/०१/२०२६ रोजी दु:खद निधन झाले.

**परभणी** - कै. सौ. विद्या दिलीप भुमकर यांचे ता.२४/०१/२०२६ रोजी दु:खद निधन झाले.

**संगमनेर** - कै. श्री. कैलास ऊर्फ आप्पासाहेब मुरलीधर केसेकर यांचे ता. २३/०१/२०२६ वयाच्या ६१ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.

**नाशिक** - कै. श्री. सुभाष रामकृष्ण जयरंगे यांचे ता. २४/०१/२०२६ रोजी वयाच्या ६६ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.

**भुसावळ** - माजी अध्यक्ष श्री बाबुराव विठ्ठल चव्हाण यांचे लहान चिरंजीव कै. श्री. ज्ञानेश्वर बाबुराव चव्हाण यांचे ता. २१/०१/२०२६ रोजी आकस्मित निधन झाले.

**शहादा** - कै. इंदूबाई चंद्रकांत लांबोळे यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले.झाले.

**पनवेल** - कै. नारायण गोविंद कासकर यांचे ता. २७ जानेवारी २०२६ रोजी निधन झाले.

**गोडादरा सुरत** - कै. द्वारकाबाई कृष्णा वाझट यांचे ता. ३०/०१/२०२६ रोजी दु:खद निधन झाले.

**पारोळा** - श्री ज्ञानेश्वर भोजराज आहेर यांच्या मातोश्री श्रीमती पुष्पाबाई भोजराज आहेर (भाभी) यांचे ता. ३१/०१/२०२६ रोजी निधन झाले.

**पनवेल** - कै. श्रीमती कल्पना दत्तात्रय शिपुरकर यांचे वृद्धपकाळाने दु:खद निधन झाले.

**वांगणी** - कै. श्रीमती इंदिरा तुकाराम घटे यांचे ता. १३ ला वर्षी दु:खद निधन झाले.

## भावपूर्ण श्रद्धांजली



**कोल्हार** : येथील श्रीरोग तज्ञ डॉ. रमेश वाव्हळ यांचे थोरले बंधू आणि महेश, संदिप व राजेश वाव्हळ यांचे वडील सेवानिवृत्त नायब तहसीलदार: **कै. श्री. भास्कर राधाकिसन वाव्हळ** (**जेष्ठ समाजकार्यकर्ते, अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाजाचे उपाध्यक्ष वय ८५**) यांचे वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, तीन मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो! ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

लेख

## “कृतज्ञता”

“सरू, चाळीस वर्षं... तब्बल चाळीस वर्षं रक्ताचं पाणी केलं ग म्या या पोरांसाठी! स्वत:च्या लेकरावाणी जपलं एकेकाला. पण आज माझा शाळेतला शेवटचा दिवस होता, निरोप समारंभ तर सोडाच, पण एकानेबी साधं १ रुपयाचं गुलाबाचं फूल बी दिलं न्हाय ग. म्या काय कमी पडलो व्हतो का ग शिकवायला? का आजकालच्या पोरांच्या काळजात पाझरच उरला न्हाय?

देसाई सर सोफ्यावर बसून लहान मुलासारखे धाय मोकलून रडत होते आणि त्यांची बायको त्यांना निमूटपणे सावरत होती.

देसाई सर...जिल्हा परिषदेच्या शाळेचे मुख्याध्यापक शिस्तीचे पक्के, पण मनाने मेणासारखे मऊ. हातातल्या छडीचा मार आणि डोळ्यातलं प्रेम, दोन्हीही विद्यार्थ्यांनी अनुभवलं होतं. आज ३१ मार्च. देसाई सरांच्या रिटायरमेंटचा (सेवानिवृत्तीचा) दिवस.

सकाळपासून देसाई सर आरशासमोर उभे राहून तयारी करत होते. त्यांनी आपला जुना पण कडक इस्त्री केलेला पांढरा शुभ्र शर्ट आणि खाकी पॅन्ट घातली होती. मनात एक वेगळीच हुरहुर होती. “आज नक्कीच शाळेत मोठा कार्यक्रम असेल. सगळी जुनी पोरं येतील, भाषणांवर भाषणं होतील, गळ्यात हारांचे ओझे असेल. “या विचारानेच त्यांचे डोळे पाणावले होते.

सर शाळेत पोहोचले. पण हे काय? शाळेचं फाटक उघडंच होतं, पण तिथे ना फुलांची सजावट होती, ना मंडप टाकला होता. पटांगण सुनं सुनं होतं. सर ऑफिसमध्ये गेले.

सहकारी शिक्षकांनी “गुड मॉर्निंग सर” म्हटलं आणि आपापल्या कामाला लागले. शिपाई रामू काका सुद्धा नेहमीसारखेच चहा घेऊन आले.

देसाई सरांना वाटलं, कदाचित सरप्राइज असेल. दुपारपर्यंत तयारी करतील. दुपार झाली, शाळा सुटायची वेळ झाली. पण काहीच हालचाल नाही. शेवटची घंटा वाजली. मुलं दप्तरं घेऊन पळाली. शिक्षकांनी रजिस्टरवर सह्या केल्या आणि “सर, येतो आम्ही, निवांत भेटा आता,” असं रुक्षपणे म्हणून निघून गेले.

देसाई सर आपल्या खुर्चीतून उठले. त्यांनी त्या रिकाम्या वर्गांकडे पाहिलं. भिंतीवरचे फळे, ती बाकडी...सगळं काही शांत होतं. त्यांच्या गळ्यात हुंदका दाटून आला. “ज्या शाळेला मी मंदिर मानलं, तिथे आज माझ्या जाण्याने कुणालाच काही फरक पडत नाही?”

जड पावलांनी, मान खाली घालून सर शाळेबाहेर पडले. रस्ताभर त्यांना लोकांचे चेहरा बघवत नव्हते. त्यांना वाटत होतं, आपण आयुष्यभर फुकट राबलो. कुणालाच कदर नाही.

घरी येताना त्यांच्या डोक्यात एकच विचार चक्रावून गेला - “कर्ज”.

देसाई सरांनी मुलीच्या लग्नासाठी आणि घराच्या दुरुस्तीसाठी बँकेतून ५ लाखांचे कर्ज काढले होते.

पेन्शनमधून अर्धे पैसे जाणार होते. म्हातारपण कसं जाईल, या चिंतेने त्यांना ग्रासलं होतं. पण त्याहीपेक्षा जास्त दु:ख होतं ते “उपेक्षेचं”

घरी आल्यावर त्यांनी पत्नीसमोर मन मोकळं केलं आणि रडू लागले. तेवढ्यात दारावरची बेल वाजली.

सरांनी डोळे पुसले आणि दार उघडलं. समोर पोस्टमन उभा होता. “देसाई साहेब, बँकेतून पत्र आलंय. अर्जंट आहे, सही करा.” सरांच्या पोटात गोळा आला. नक्कीच कर्जाच्या हप्त्याची नोटीस असेल. रिटायर झालो नाही तोच बँकेने तगादा लावला, असं वाटून त्यांनी थरथरत्या हाताने पाकीट घेतलं.

ते सोफ्यावर बसले आणि त्यांनी पाकीट फोडलं. आत एक बँकेचं अधिकृत पत्र आणि एक दुमडलेला कागद होता. सरांनी बँकेचं पत्र वाचायला सुरुवात केली आणि. वाचता वाचता त्यांचे डोळे विस्फारले. त्यांना स्वत:च्या डोळ्यांवर विश्वास बसेना. त्यांनी चष्मा पुसून पुन्हा



कै. तुकाराम नारायण पावले व कै. श्रीमती चंद्रभागा तुकाराम पावले व कै. मुक्तेश्वर तुकाराम पावले यांच्या स्मरणार्थ
श्रीमती सुलभा मुक्तेश्वर पावले, मुलुंड यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

वाचलं. त्यात स्पष्ट लिहिलं होतं - श्री. देसाई सर, तुमचे घराचे ५,००,००० (पाच लाख) रुपयांचे गृहकर्ज आज दिनांक ३१ मे रोजी पूर्णपणे परतफेड (Nil/Closed) करण्यात आल आहे. आता बँकेची तुमच्यावर कोणतीही देणी बाकी नाहीत." सर गोंधळले. "हे कसं शक्य आहे ? मी तर पैसे भरलेच नाहीत. "त्यांनी तो सोबतचा दुसरा कागद उघडला. ते एक हाताने लिहिलेलं पत्र होत.

**: पत्र :**

"आदरणीय देसाई सर"

आम्हाला माहित आहे, आज तुम्ही शाळेतून रिकाम्या हाताने आणि जड अंतकरणाने घरी गेलात. तुम्हाला वाटलं असेल की तुमच्या विद्यार्थ्यांची आठवणशक्ती कमी झाली आहे. पण सर, तुमची शिकवण आम्ही विसरले नाही. आम्ही सर्वांनी (तुमच्या आजी-माजी विद्यार्थ्यांनी आणि सहकारी शिक्षकांनी) मिळून ठरवलं होतं की, तुम्हाला हार-तुरे, शाल-श्रीफळ आणि पेढे देऊन तुमचा सत्कार करायचा नाही. त्या हार-फुलांची किंमत दोन दिवसात कोमेजुन जाते. त्याऐवजी आम्ही गेल्या सहा महिन्यांपासून' गुप्त वर्गणी' जमा करत होतो. त्यात आम्हां विद्यार्थ्यांसोबत शाळेतल्या सगळ्या शिक्षकांनी, शिपायांनी आणि मुख्य म्हणजे तुमच्या मार्गदर्शनाखाली मोठमोठ्या पदावर असलेल्या तुमच्या माजी विद्यार्थ्यांनी तर खूप मदत केली. आम्हाला माहित होतं की तुमच्या डोक्यावर कर्जाचं ओझे आहे आणि निवृत्तीनंतर तुम्हाला त्याची काळजी सतावणार आहे. म्हणून, तुमच्या निवृत्तीच्या दिवशी, आम्ही तुम्हाला "तणावमुक्त" आयुष्य भेट देत आहोत. तुमच्यावर प्रेम करणारी... तुमची "कृतघ्न" वाटलेली पोरं! पत्राखाली शेकडो विद्यार्थ्यांच्या सह्या होत्या. देसाई सर स्तब्ध झाले. त्यांच्या हातातून कागद गळून पडला. सर, तुम्ही आम्हाला घडवलंत, आता तुमचं म्हातारपण सुखात जावं, हीच आमची खरी गुरुदक्षिणा! तेवढ्यात घराबाहेर "देसाई सर आगे बढो, हम तुम्हारे साथ है!" अशा घोषणा ऐकू आल्या. सरांनी खिडकीतून बाहेर पाहिलं. संपूर्ण गल्लीत त्यांचे शेकडो विद्यार्थी, शिक्षक आणि गावकरी उभे होते. कुणी ढोल वाजवत होतं, तर कुणी डोळ्यात पाणी आणून बघत होतं. देसाई सर धावत बाहेर आले. त्यांनी कोणा एकाला नाही, तर समोरच्या गर्दीला हात जोडले आणि गुडघे टेकून जमिनीवर डोकं ठेवलं. त्यांच्या डोळ्यातून आज दु:ख नाही, तर अपार कृतज्ञतेचे अश्रू वाहत होते. त्यांना उमजलं होतं - "माणसं जोडली की पैसा गौण ठरतो. हार गळ्यात नाही, तर लोकांच्या हृदयात असावा लागतो."

आज देसाई सर जगातले सर्वात श्रीमंत मुख्याध्यापक होते.

■■■

## ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संलग्न सात संस्थांची नावे

१) स्वकुळ साळी समाज,भिवंडी
अध्यक्ष : **श्री. आनंद पावले** 9860560497

२) स्वकुळ साळी हितसंवर्धक संस्था, डोंबिवली
अध्यक्ष : **श्री.पंकज दिवटे** 9820882289

३) स्वकुळ साळी समाज,कल्याण
अध्यक्षा : **सौ शरयू पाठक** 9867927963

४) स्वकुळ साळी समाज, उल्हासनगर
अध्यक्ष : **श्री मंगेश कनोजे** 9321886645

५) स्वकुळ साळी समाज, ठाणे शहर
अध्यक्ष : **डॉ. प्रतिक्षा बोर्डे**. 9867248232

६) स्वकुळ साळी समाज, अंबरनाथ
अध्यक्ष : **श्री. मिलिंद जांभळे** 7875523388

७) श्री जिव्हेश्वर स्वकुळ साळी समाज, बदलापूर
अध्यक्ष : **श्री.संजीव साळी** 9320442911
(ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज कार्यकारिणीचे पदसिद्ध सभासद)



**कै. ह.भ.प. श्री. सदानंद महादेव दुर्गुळे यांच्या स्मरणार्थ**
**श्री. महेश (राजू) सदानंद दुर्गुळे यांच्या सौजन्याने पृष्ठदान.**

# ५) जेष्ठ समाज बांधव सहल वृत्तांत बदलापूर

शुक्रवार दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी, कुळगाव बदलापूर येथील ज्येष्ठ समाजबांधवांसाठी आयोजित सहल विष्णूबाग येथे अत्यंत उत्साह व आनंदात संपन्न झाली. जेष्ठ मंडळींनी दिवसभर एकत्र भेटावे, मन मोकळ्या गप्पा माराव्यात, जुन्या आठवणींना उजाळा मिळावा,बदलापुरात नव्याने वास्तव्यास आलेल्या ज्येष्ठ समाज बंधू भगिनींची ओळख व्हावी हे सहलीचे मुख्य उद्दिष्ट होते. सकाळी ठीक ८.०० वाजता बसच्या पहिल्या थांब्यावरून बस निघाली.

विविध थांब्यावरून जात ९.०० वाजता बदलापूर पासून ८ ते ९ किलोमीटरवर असलेल्या विष्णूबाग येथे बस पोहचली. सर्व ज्येष्ठ मंडळींचे गुलाब पुष्प व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. बटाटा वडा, मिसळ, पोहे, केळे, पपई अशा रुचकर नाश्त्याने सर्वजण तृप्त झाले. परिसर फेरफटका व निसर्गरम्य परिसरात फोटो सेशन झाल्यावर, येथील विलायती चिंचेच्या झाडांनी तयार केलेल्या जिलेबीबाग येथे सगळ्यांनी गोलाकार बसून आपली ओळख करून दिली. नुसतेच नाव न सांगता आपले बालपण ते आजपर्यंतचा प्रवास ह्या ओळखीतून उलगडला.श्री जिव्हेश्वर सामाजिक संस्था कुळगाव बदलापूर संस्थेचा आज जो काही विकास झाला त्याची सुरुवात कशी झाली याचा वृत्तांत माटोळेकाकांनी सांगीतला. सुरुवातीला येथे ४,५ कुटुंबच होते. त्यांची पुढील पिढी व इतर समाजबांधव आज समाज कार्यात आहेत हे ऐकुन व आम्हीही यात सहभागी आहोत हे सर्व खुप भारी वाटलं. त्यानंतर नुकत्याच दिवंगत झालेल्या समाजबंधू भगिनी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. तद्नंतर गाण्यांच्या भेंड्या हा कार्यक्रम जोरदार झाला. जुनी भावपूर्ण हिंदी, मराठी गाणी नव्याने ऐकायला मिळाली. ह्या नंतर परत उर्वरित परिसर फेरफटका आपापसात हितगुज, झोका, गप्पा गंमत करत सगळे दुपारच्या जेवणासाठी एकत्र जमले.

जेवणानंतर प्रथेप्रमाणे थोडी वामकुक्षी. नंतर बादली चेंडू खेळ झाला. ४.३० वाजता चहा झाला. बऱ्याच जणांनी तिळगुळ आणले होते त्याचे वाटप केले. श्री गोरखनाथ घोगे काका यांचा वाढदिवस असल्याने शैला दुर्गुळे व स्मिता कोदे यांनी परिसरातील पाना फुलांचा सुंदर असा पुष्पगुच्छ बनवला. हा पुष्पगुच्छ देऊन व केक कापून घोगे काकांचा वाढदिवस साजरा करण्यात आला विष्णुबागच्या संचालिका सौ. प्रणिता रसाळ ह्यांचे आभार मानण्यात आले.

विष्णूबागला निरोप देत... देवळाली गावातील चावीची विहीर पाहण्यात आली.चावीच्या आकाराची ही विहीर शिवकालीन आहे.२५ पायऱ्या उतरून खाली गेल्यास विहिरीच्या अंतर्गत भागात दिव्यांसाठी सुबक कोनाडे,अर्धकमान,कोरीव काम व शिल्पे आहेत.

ह्या नंतर सहलीची सांगता झाली.ह्या ज्येष्ठ समाजबांधव सहलीची संकल्पना श्री संजीव साळी यांची होती.

सहलस्थळ निश्चित करणेसाठी श्री अरविंद देवकर व श्री हेमंत बंबाळे ह्याचे सहकार्य लाभले.

श्री राजेश साळी व प्रमोद आमते यांनी अत्यंत माफक खर्चात काटेकोरपणे बस मार्ग व वाहतूकवेळ नियोजन केले. सौ.मनिषा दुर्गुळे,सौ.विद्या खुस्तुले व सौ. वैशाली कांबळे श्री अभिजीत कोदे ह्या स्वंयसेविकांनी सहलीचे स्वागत ते समारोप अशा संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणीचे कार्य केले.

सहलीचे आर्थिकखाते श्री नितीन आमते व श्री ईश्वर साळी यांनी सांभाळले. श्री वसंतराव माटोळे यांनी स्वागताचे फुले व चॉकलेट प्रायोजित केले.

**वृत्तांकन :**

सौ.मनिषा दुर्गुळे, सौ विद्या खुस्तुले, सौ वैशाली कांबळे.

यानंतर स्मरणिकेचे प्रकाशन सर्व मान्यवरांचे शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. प्रदीप पांडुरंग शिंगारेसाहेब व मा. डॉ. अशोक विनायक दांडेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करून, उपस्थित उपवधू - वरांना शुभेच्छा दिल्या. व पालकांनी या मेळाव्यामधील उपवधू - माहितीच्या आधारे आपल्या मुलांसाठी निवड करावी असे आवाहन केले. यानंतर उपस्थित उपवधू वरांनी व्यासपीठावर येवून आपला परिचय करून दिला. तसेच जे उपवर उपस्थित नव्हते. त्यांच्या पालकांनी व्यासपीठावर येवून, आपल्या उपवधू - वरांची माहिती उपस्थितांना दिली. या मेळाव्यासाठी अंदाजे २५०० समाज बांधव उपस्थित होते. या उपवधू - वर मेळावा कार्यक्रमासाठी स्नेहभोजनाची व्यवस्था पुणे स्वकुळ साळी समाज संस्थेमार्फत करण्यात आली होती. मंडपामध्ये एल. ई. डी. च्या दोन स्क्रीन ठेवण्यात आल्या होत्या. याचे नियोजन समाजबांधव श्री. सनी साळी यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ. राजश्री पराळे, सौ. सुजाता साळी, सौ. सरीता महातेकर, सौ. शिला टपळे, सौ. विभावरी टपळे यांनी केले. या मेळाव्याचे ऑनलाईन नोंदणीचे सॉफ्टवेअरचे काम श्री. श्रीवर्धन लिंबकर व सौ. मानसी श्रीवर्धन लिंबकर यांनी केले. हा मेळावा यशस्वी होण्यासाठी सर्वश्री पंडित मर्ढेकर, सुधाकर जाळिंद्रे, विजयकुमार राजूशेठ टपळे, बजरंग आकडे, हनुमंत घुबे, संजय ऐरंडे, ॲड. भगवान वैद्य, विनोद रोड, किशोर चंदावरकर, संदिप क्षिरसागर, प्रसाद कविटकर, दिपक मारवाडी, चंद्रकांत पावले, जयंत किशोर उपरे, स्वप्निल जाळिंद्रे, धीरज धांदल, संजय पिठे, ज्ञानेश्वर पारखे, लक्ष्मण कनोजे चंद्रकांत धुळे, प्रविण लुंगे, विलास सातपुते, अजय सातपुते, प्रफुल्ल अष्टेकर, अमोल अष्टेकर, दिपक अंबुरे, धनंजय माटे, दीपक दाहोत्रे, जगदीश दळवी, शांताराम लुंगे, रमेश बानकर, संदिप वगत मर्ढेकर सुहास अरविंद भागवत, दत्तात्रय अष्टेकर, नंदकुमार भागवत, राजेंद्र भागवत, राजेंद्र टपळे (साळी) सौ. भाग्यश्री लाड, सौ. सुरेखा मारवाडी, श्रीमती कल्पना उगले, श्रीमती शोभा टपळे, श्रीमती सुवर्णा माटे, श्रीमती सीमा ओगले, सौ. शर्मिला चंदावरकर, सौ. शिल्पा दाहोत्रे, सौ. ज्ञानदा घुबे, ॲड सरिता महालेकर, सौ. तृप्ती पावले, सौ. संगिता अंबुरे, सौ. संगिता लुंगे, सौ. वर्षा रोडे, सौ. प्रज्ञा पिठे, सौ. वैशाली अष्टेकर, सौ. प्रतिक्षा कांबळे, सौ. शीला टपळे अतिशय परिश्रम घेतले समाजाचे विश्वस्थ श्री. किशोर चंदावरकर यांनी कार्यक्रमाच्या शेवटी आभार व्यक्त केले.

**वार्तांकन :- हनुमंत घुबे, सेक्रेटरी**







**कै. प्रल्हाद पंढरीनाथ साळी (काळमेख) नशिराबाद यांच्या स्मरणार्थ**
**श्रीमती द्वारकाबाई प्रल्हाद साळी, बदलापूर यांच्या सौजन्याने कायमस्वरुपी पृष्ठदान. सन्माननिय हितचिंतक.**

# माघी श्री गणेशोत्सव, रानवली - २०२६ वृत्तान्त

"एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि तन्नो दन्ति : प्रचोदयात्"

रानवली येथील श्री क्षेत्र वरदविनायक गणेश मंदिर येथे प्रतिवर्षाप्रमाणे माघी श्री गणेशोत्सव संस्था व्यवस्थापक, संचालक मंडळ व सल्लागार, हितचिंतक यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. प्रतिपदा,सोमवार दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी संध्याकाळी ठीक ६ वा.३० मि. नी संस्थेचे पदाधिकारी, महिला मंडळ आणि निमंत्रित पाहुणे यांच्या उपस्थितीत श्री गणेश पूजन झाले व सोन्याचा मुकुट चढविण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. दत्ताराम रामकृष्ण डोईफोडे आणि संस्थेचे माजी अध्यक्ष मा. विजय भालचंद्र वाऊळ यांनी प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री वरदविनायक बाप्पा तुझा जन्मोत्सव आहे तो निर्विघ्नपणे पार पडावा अशी श्री चरणी प्रार्थना करण्यात आली. तद्नंतर मंदिराच्या कळसावर ध्वजारोहन करण्याकरिता सर्व समाजबंधू-भगिनींनी मंदिराच्या गाभाऱ्याला पाच प्रदक्षिणा घालून टाळ - मृदुंग वाजवत कळसावर भगवा ध्वजाचे आरोहन करण्यात आले. त्याचप्रमाणे मंदिर ते मुख्यप्रवेशद्वारपर्यन्त "जय गजानन, जय गजानन मोरया "या गजरामध्ये पायी दिंडी काढण्यात आली व प्रवेशद्वारावर ध्वजारोहन करुन सर्वांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली. रात्रौ ठीक ८ ते ९ स्थानिक स्वकुळ साळी समाजाच्या संगीत भजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच रात्री ठीक १० ते ११ श्री गोरक्षनाथ भजन मंडळ, श्रीवर्धन यांचे संगीत भजन झाले.

**द्वितीया मंगळवार दि. २० जानेवारी २०२६** रोजी उपक्रमास सकाळपासून पाहुण्याची रेलचल चालू होती. रात्रौ ठीक ९ ते १० वाजता श्री दत्तगुरु प्रासादिक, भजन भट्टीचा माळ यांच्या संगीत भजनाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या प्रथेप्रमाणे श्रीफळ, शाल, मानधन देऊन संस्थेचे सचिव श्री. रमेश सखाराम शिपुरकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

**तृतीया बुधवार दि. २१ जानेवारी २०२६:** ठीक सकाळी ६-३० वाजता गणेश याग आणि भगवान श्री जिव्हेश्वर अभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. "गणेशयाग" पूजेचे आयोजन करण्यासाठी सौ. वैजयंती विठोबा तांबडे, सौ. विमल विजय वाऊळ, सौ. वैभवी विठोबा तांबडे, सौ. संजना संजय तांबडे, सौ. पायल प्रथमेश डोईफोडे यांना जबाबदारी दिली होती.

गणेशयाग पूजेच्या मानकऱ्यांनी सकाळी ६.३० वाजता वेळेत उपस्थित राहून सदर उपक्रमास प्रत्येकी रु. तीन हजार देणगी देऊन सहकार्य केले त्या बद्दल सर्व सात जोडप्यांचे मन :पूर्वक आभार. श्री. व सौ. पूजा गणेश डोईफोडे, श्री. व सौ. श्रेया श्रीकांत डांगे, श्री. व सौ. अमृता आनंद निमकर,श्री. व सौ. शलाका दर्शन कारभारी, त्याच प्रमाणे भगवान श्री जिव्हेश्वर आणि माता अंकिनी - दशांकिनी अभिषेक पूजेचे मानकरी श्री. व सौ. श्रद्धा गणेश अंबुर्ले यांच्या हस्ते अभिषेक पूजा करण्यात आली. त्याच प्रमाणे श्रीफळ, खण, साडी, पॅन्टपीस, शर्टपीस देऊन उभयतांना संस्थेतर्फे श्री. व सौ. सुचिता दत्ताराम डोईफोडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

**मेडिकल कॅम्प मोफत! मोफत! मोफत!** जनसेवा हीच ईश्वर सेवा हे समजून श्री गणेश मंदिर ट्रस्ट रानवली संस्थेतर्फे ही सेवा मोफत देण्यात आली. अल्टस गुड प्रायव्हेट लिमिटेड संचालित आयुष हॉस्पिटल, नांदगाव ता. मुरुड, जि. रायगड यांच्याकडून मेडिकल कॅम्प सेवा देण्यासाठी पाच स्पेशालिस्ट डॉक्टर, बारा इतर स्टाफ होते; त्यामध्ये विशेष स्त्रियांच्या आजारावर तपासणी, डायबेटीस, रक्त तपासणी अशा अनेक तपासण्या झाल्या. सदर मेडिकल कॅम्पमध्ये फक्त आपल्या स्वकुळ साळी समाज बंधू भगिनींनी उत्कृष्ट प्रतिसाद दिला. एकूण अंदाजे ७० ते ८० भाविकांनी लाभ घेतला याबद्दल सर्वांचे आणि डॉक्टर आणि स्टाफ यांचे आभार.

रात्रौ ठीक ७-३० ते १०- ०० वाजता ह. भ. प. श्री. मंदारबुवा गोखले, पुणे यांचे अतिशय भक्तीपूर्ण कीर्तन - प्रवचन झाले. आरती व महाप्रसाद सर्वांना देण्यात आला.

**चतुर्थी, गुरुवार दि.२२ जानेवारी २०२६**:- रोजी गणेश अभिषेक सर्वांसाठी वर्षातून एकदाच मूर्तीला स्वत :च्या हातून अभिषेक करावयास दिले जाते. जाते. त्या करिता या अभिषेकाची वेळ पहाटे ५ ते ६-३० वाजेपर्यंत असते एकूण ८० भाविकानी अभिषेक पूजेचा लाभ घेतला. सदर उपक्रमात



**कै. श्री. करिअप्पा बुध्दिवंतअप्पा गच्ची व कै. श्रीमती गंगम्मा करिअप्पा गच्ची, गदग-बेटगेरी (कर्नाटक) यांच्या स्मरणार्थ डॉ. गोपाळकृष्ण करिअप्पा गच्ची, डोंबिवली यांच्या सौजन्याने पृष्ठदान.**

सहभाग घेतल्याबद्दल धन्यवाद! प्रतिवर्षाप्रमाणे श्री. व सौ. निशा दिलीप निमकर या उभयतांना गणेश अभिषेक करण्याचा बहुमान देण्यात आला.

ठीक सकाळी ७ वा. १५ मि. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. स्वरूपजी कंकाळ व निमंत्रित अतिथी सर्वांचे आगमन व त्यांचे हार्दिक स्वागत.

**सत्कार कार्यक्रम आणि त्रैवार्षिक अहवाल प्रकाशन सोहळा**

सकाळी ठीक ७-३० वाजता कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे माजी अध्यक्ष विजय भालचंद्र वाऊळ यांनी जय गणेश जय जिव्हेश्वर नामाचा जय जय करत प्रमुख अतिथींचे स्वागत करून त्यांना व्यासपीठावर निमंत्रित करण्यात आले. श्री. स्वरुपजी विजयकुमार कंकाळ (उपजिल्हाधिकारी महाराष्ट्र शासन), कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत हावरे, श्री. अविनाश पंढरीनाथ साळी, श्री.प्रशांत पांढरपट्टे, श्री. दत्ताराम रा. डोईफोडे, श्री.भास्कर गोविंद चौधरी, श्री. उदयकुमार लालचंद साळी. श्री.सुधाकर नारायण शिपुरकर, श्री. दिलीप जाळींद्रे, प्रा. दिनकर गंगाराम डहाके, श्री.अजित साळी, श्री. सुरेशदादा ल. लंगोटे, श्री. देवेंद्र पु.क्षीरसागर, श्री. महादेव साळी, श्री. विनायक सदानंद बोरकर, श्री. शिरीष काटकर, डॉ. चंद्रशेखर बारगजे, श्री. विठोबा तांबडे, श्री. विठोबा हावरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सर्व प्रथम उपस्थीत पाहुण्यांना शाल, श्रीफळ, ट्रॉफी देऊन संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार, सहसचिव व कार्यकारिणी सदस्य यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

**त्रैवार्षिक अहवाल प्रकाशन सोहळा**

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. स्वरूपजी विजयकुमार कंकाळ यांच्या हस्ते अध्यक्ष स्वकुळ साळी ज्ञातिगृह, आळंदी यांच्या व मान्यवरांच्या उपस्थितीत त्रैवार्षिक अहवालाचे प्रकाशन झाले. सर्व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाचे आयोजन शिस्तबद्ध पद्धतीने व काटेकोरपणे केल्यामुळे संस्थेच्या सर्व कार्यकारिणी सदस्यांचे कौतुक करण्यात आले त्याच प्रमाणे इचलकरंजी महिला मंडळ व सांगली महिला मंडळ या दोन्ही महिला मंडळाचे रानवली महिला मंडळाने ब्लाऊजपीस खणा - नारळानी ओट्या भरल्या.

**वाढदिवसाच्या शुभेच्छा :-** आम्ही संस्थेतर्फे आवाहन करतो ज्यांचा गणेशोत्सवाच्या दिवशी वाढदिवस असेल त्यांनी आमच्याकडे नोंद द्यावी त्याप्रमाणे श्री.महादेव बबन साळी, सौ. विद्या रणजित साळी, श्री. रणजित रत्नकुमार साळी आणि डी.जी. निमकर यांना संस्थेतर्फे शाल, श्रीफळ देऊन व ग्रिटींग देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. विशेष असे की मा.श्री. डी जी. निमकर हे वय वर्षे ५० पासून प्रत्येक काही ठराविक वर्षाला वयानुसार देणगी देतात. याही वर्षी त्यांचा ८० वा वाढदिवस आहे म्हणून त्या निमित्ताने रु. ८०८० देणगी दिली त्याबद्दल त्यांचे विशेष आभार व धन्यवाद!

बांद्रे येथील ९६ वर्षांच्या वयोवृद्ध आजी आजच्या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. तसेच श्रीमती हिराबाई गोविंद चौधरी यांचे आणि श्रीमती सुमती मुकुंद तांबडे वय वर्षे ९२ यांचे रानवली महिला मंडळानी श्रीफळ, शाल देऊन पुढील आयुष्य सुखसमृद्धीचे,आनंदाचे जावो अशी श्री वरदविनायक चरणी प्रार्थना करून शुभेच्छा दिल्या. सर्व उपस्थित भाविकांना अल्पोपहार व चहा देण्यात आला. जन्मोत्सव सोहळा सकाळी ठीक १०-३० वाजता ह. भ. प. श्री. मंदारबुवा म्हात्रे गोखले यांनी माघी गणेशोत्सव कीर्तनास सुरुवात केली. सर्व भाविकांनी कीर्तनाचे श्रवण केले. मंदिरातील या वर्षाची सजावट, शिस्तबद्ध पद्धतीचे नियोजन, शांत वातावरण वाखाणण्यात आले आणि स्वयंसेवकानी दिलेला प्रतिसाद पाहता खूप आनंदमय वातावरणात ठीक १२ वा. ३९ मी. नी ह.भ.प श्री. मंदारबुवा गोखले यांच्या मंत्रघोषात गणेश जन्मोत्सव सोहळ्यात भाविकांनी पुष्पवृष्टीचा वर्षाव केला. फटाक्यांची आतिषबाजी व "जय गणेश जय जय गणेश" च्या जयघोषात बाप्पाचा जन्मोत्सव साजरा झाला. संस्थेच्या प्रथेप्रमाणे या वर्षाचे पूजेचे मानकरी श्री. विनायक श्रीधर तांबडे हे होते. त्याच प्रमाणे संस्थेचे अध्यक्ष श्री. दत्ताराम रा. डोईफोडे. उपजिल्हाधिकारी महाराष्ट्र शासन - स्वरूपजी कंकाळ, श्रीवर्धनचे वरीष्ठ पो. नि. सुरेंद्र गरड विजय वाऊळ, चंद्रकांत हावरे, अविनाश साळी. डॉ. चंद्रशेखर बारगजे, प्रशांत पांढरपट्टे, गणेश अंबुर्ले, उदयकुमार साळी, भास्कर चौधरी, महादेव साळी, किरण अंबुर्ले, सुरेशदादा लंगोटे, दिलीप जाळींद्रे, अजित साळी, देवेंद्र क्षीरसागर, दिनकरराव डहाके, बाळा साळी परशुराम डोईफोडे, अशोक अंबुर्ले, सचिन निमकर, आनंद निमकर, मिलिंद गोंधळेकर, सुरेश



**कै. महादेव बाळा दुर्गुळे, कुडली यांच्या स्मरणार्थ**
**श्री. सदानंद महादेव दुर्गुळे व सौ. शारदा सदानंद दुर्गुळे, भिवंडी यांच्या सौजन्याने पृष्ठदान.**

मांडवकर, चंद्रकांत हावरे (बोर्ली), दिलीप निमकर, दीनानाथ अंबुर्ले यांना पूजेचा बहुमान देण्यात आला. त्यानंतर पाळणागीत गाण्यासाठी सौ. अपर्णा निमकर व सौ. सुचिता डोईफोडे यांना बोलावण्यात आले. सौ. सान्वी राहुल तांबडे, सौ. संगीता उदयकुमार साळी, सौ. विद्या रणजित साळी यांनी पाळण्यात बाळ गणेशाची मूर्ती ठेवून अंगाई गीत गजाननाचा जयघोष करुन गोड आवाजात बाप्पाचे नाव "मोहत्कट" असे ठेवले. त्यानंतर श्री गणेश बाप्पाच्या मूर्तीचे सर्वांना बसल्या जागीच दर्शन देण्याची पारंपारिक प्रथा आहे. गणेशाच्या महाआरतीनंतर भक्तांना पेढे. सुंठवडा, तिळगूळ लाडू. तीर्थप्रसाद दिला जातो. त्यानंतर भाविकांना भोजनप्रसाद दिला जातो. दुपारी ठीक ४ वाजता भगवान श्री जिव्हेश्वर आणि माता अंकिनी - माता दशांकिनी यांचा गोरज मुहूर्तावर विवाह सोहळा अतिशय उत्साहात मंगलाष्टक, टाळ, मृदुंग, ताशा अशा मंगलमय वातावरणामध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमानंतर महिलांनी हळदीकुंकू समारंभ २३० महिलांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या वाणाचा संपूर्ण खर्च सौ. हर्षदा हरिश्चंद्र शिपुरकर यांनी दिला त्यांचे विशेष आभार व धन्यवाद.

श्री गणेश पालखी सोहळा ठीक ५ वाजता सुरू झाला. या पालखी सोहळ्यास निमंत्रित माननीय आमदार महाराष्ट्र राज्याचे मंत्री महोदया कु.आदिती सुनील तटकरे यांना पालखी पूजन करण्याचा बहुमान देण्यात आला. त्याच प्रमाणे पालखी उचलण्याचा मान कु. आदिती तटकरे व सौं. वैभवी हावरे यांना देण्यात आला. पालखी सर्व समाज बांधवांच्या घरी दर्शनासाठी घेऊन जाणे ही पूर्वजांनी पाडलेली प्रथा आम्ही पाळत आहोत. तद्नंतर रात्री ठीक ८.०० वाजता महाआरती होऊन सांगता समारोप करून महाप्रसाद देण्यात आला.

**मनोरंजन कार्यक्रम :-** रात्री ठीक १० वाजता मनोरंजन कार्यक्रमात स्थानिक समाज बांधवांनी सहभाग घेऊन उत्कृष्ट प्रकारे सादर केला. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री. अनिल सदानंद हावरे यांनी केले. कार्यक्रम सांगता समारोप रात्री २ वाजता झाला. सव सर्व कलाकारांचे मन:पूर्वक आभार. धन्यवाद!

पंचमी शुक्रवार दि २३ जानेवारी रोजी काल्याचे कीर्तन म्हणजे ह.भ.प.श्री. मंदारबुवा गोखले, पुणे यांचे लळिताचे कीर्तन फारच अप्रतिम झाले. कीर्तनाची रंगत पाहून सर्व भाविक भारावून गेले. प्रत्येकाने गोपाळकाल्याचा आनंद आणि प्रसाद घेतला.

**किर्तनकार बुवांचे सत्कार :-** ह.भ.प. श्री मंदारबुवा गोखले कीर्तनाचा सांगता समारोप करतांना म्हणाले आज पर्यंत मला या ठिकाणी तीन वर्षे कीर्तन करण्याची सेवा दिली. त्याबद्दल मी आपल्या संस्थेचा आभारी आहे. आपला समाज धार्मिक व विचारवंत आणि सुशिक्षित आहे. मी या ठिकाणी तीन दिवस पाहतो आहे येथे येणाऱ्या प्रत्येक भाविकांचा आदर सत्कार खूप छानप्रकारे करण्यात आला. बुवांचे आणि तबला वादक व हार्मोनियम या तिघांचे संस्थे तर्फे शाल, श्रीफळ, ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. या वर्षाचे कीर्तनकार मानधन श्रीमती सुनंदा जनार्दन मुद्‌गुल परिवारतर्फे देण्यात आले त्याबद्दल त्यांचे विशेष आभार - धन्यवाद!

**शैक्षणिक गुणगौरव सोहळा :-** कु. अदिति धिरज ढवण CA, चि. निरज भालचंद्र हरवंदे CA, चि. प्रणव आनंद हावरे- अग्रीकल्चर डिप्लोमा, कु. भाग्यश्री सुरेद्र तावडे पदवीदर, कु. समीरा मिलिंद मुद्‌गुल बारावी उत्तीर्ण ९२ टक्के, कु. संस्कृती विनायक तांबडे बारावी उत्तीर्ण ८१ टक्के, चि. सोहान राहुल हावरे दहावी उत्तीर्ण ९६ टक्के, कु. सौम्या संदेश वैद्य दहावी उत्तीर्ण ९३ टक्के, कु. मुग्धा सचिन निमकर दहावी उत्तीर्ण ९२ टक्के , चि. निहार विकास घटे दहावी उत्तीर्ण ८९ टक्के, कु. श्रुती संदीप शिपुरकर दहावी उत्तीर्ण ८२ टक्के , कु. संस्कृती संतोष साळी दहावी उत्तीर्ण ८० टक्के, कु समृद्धी मकरंद तांबडे, दहावी उत्तीर्ण ४६ टक्के या सर्व विद्यार्थ्यांचे शाल, ट्रॉफी व रोख बक्षीस देऊन संस्थेच्या पदाधिकारी यांचे हस्ते गौरविण्यात आले. अशाप्रकारे माघी उत्सव कार्यक्रम अतिशय जल्लोषात साजरा झाला. या कार्यक्रमाला ज्या मान्यवर आणि भाविकानी, संस्थेचे सभासद यांनी वस्तू रुपात देणगी दिली आहे; त्यांचे आम्ही मनापासून आभार मानतो. असेच आपले सहकार्य लाभो ही श्री वरदविनायक चरणी प्रार्थना! जय गणेश । जय जिव्हेश्वर । जय हो माता अंकिनी माता दशांकिनी की।

**वृत संकलन : विजय वाऊळ**
**संपर्क :- ९८२१३०८१५१**

कै. श्रीमती पार्वतीबाई महादेव दुर्गुळे, कुडली यांच्या स्मरणार्थ
श्री. विठोबा महादेव दुर्गुळे व सौ. विलासीनी विठोबा दुर्गुळे, भिवंडी यांच्या सौजन्याने पुष्ठदान.

## एरंडोल विठ्ठल मंदिरात महासभा संपन्न

एरंडोल - दि. ४-१-२०२६ - एरंडोल येथे सालाबादप्रमाणे साळी समाजाची महासभा रविवार दि. ४ जानेवारी २०२६ रोजी पौष वद्य पाडवा तिथीला एरंडोल येथील साळी समाजाच्या श्री विठ्ठल मंदिरात संपन्न झाली. या सभेला जवळपास ५०० समाज बंधू भगिनी उपस्थित होते. या महासभेस सुरत, बडोदा, जळगाव, पारोळा, एरंडोल, सावदा, फैजपूर, भुसावळ, पाचोरा, भडगाव, अमळनेर, धुळे, बरहाणपूर, इंदौर, उधना, अहमदाबाद, डोंबिवली, मुंबई, अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण, बदलापूर, ठाणे, नशिराबाद, चोपडा, यावल, नाशिक, वरणगांव, जामनेर, पुणे अशा विविध गावांहून समाज मंडळी उपस्थित होती.

सकाळी ७ ते ९ या वेळेत श्री विठ्ठल मंदिरात श्री विठ्ठल रुक्मिणी, श्री जिवेश्वर यांचे अभिषेक, पूजा डोंबिवली येथील सौ कल्पनाताई ईश्वरलाल साळी व श्री ईश्वरलाल एकनाथ साळी (फंड) स्वकुळ समाचारचे संपादक या दांपत्याच्या हस्ते करण्यात आली. तसेच नविन मंदिरातील श्री गणेश, श्री शिव, श्री मारुती व श्री लालमन महाराज व श्री विठोबा महाराज यांच्या समाधीची पूजा-अभिषेक करण्यात आला. सर्वांनी आरती म्हटली. यानंतर सर्व उपस्थितांनी अल्पोपाहार घेतला.

सभा सुरु होण्यापूर्वी महिला मंडळींनी सुंदर रांगोळ्या काढल्या व मान्यवरांचे औक्षण व स्वागत करून महासभेच्या व्यासपीठावर स्वागत करण्यात आले. महासभेचे दीपप्रज्वलन एरंडोल नगरीचे नगराध्यक्ष डॉ. नरेंद्र ठाकुर, श्री सोमनाथ कासटकर (महासभा अध्यक्ष), श्री उदयकुमार साळी, महासभेचे सल्लागार, केंद्र समितीचे अध्यक्ष श्री अशोकभाऊ साळी, महासभेचे सल्लागार श्री दिलीप राऊत, स्वकुळ समाचारचे संपादक श्री ईश्वरलाल साळी (फंड), ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज अध्यक्ष तथा प्रांतिकचे उपाध्यक्ष सौ. शैलजाताई कासटकर, महासभा उपाध्यक्ष श्री रामचंद्र भुतकर, महासभा कोषाध्यक्ष श्री अशोक दिवटे, महासभा सदस्य श्री विलासराव गरुड, श्री राजेंद्र साळी, श्री सुरेश आढाव, सौ. क्षमाताई साळी, सौ. शोभाताई साळी, सर्व महासभा कार्यकारीणी सदस्य, एरंडोल ट्रस्टचे सेक्रेटरी श्री वासुदेव साळी, मंदिराचे कोषाध्यक्ष श्री अशोक रामरतन साळी, स्थानिक उत्सव कमिटी एरंडोलचे अध्यक्ष श्री प्रकाशभाऊ साळी, श्री पंडित साळी गुरुजी इ. मान्यवर उपस्थित होते.

सर्वप्रथम महासभेचे सेक्रेटरी श्री अरुणभाऊ शिवदास डहाके यांचे ४ डिसेंबर २०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. महासभेचा सेवाभावी कार्यकर्ता हरपल्याने श्री अरुणभाऊची अनुपस्थिती आज जाणवत होती. सौ. क्षमाताई साळी व श्री सोमनाथ कासटकर यांनी कै. श्री अरुणभाऊ यांच्या कार्याची माहिती सभेस दिली, व मनोगत व्यक्त केले. महासभेने कै. अरुणभाऊ डहाके व सर्व ज्ञात-अज्ञात दिवंगत समाजबांधवांना श्रद्धांजली अर्पण केली.

महासभेचे आजच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री सोमनाथ कासटकर यांनी केले. मा. नगराध्यक्ष डॉ. नरेंद्र ठाकुर यांचा सत्कार केला. मंदिरासमोरील जागा सुशोभित करण्याबाबत जरूर ती मदत करील असे आश्वासन त्यांनी दिले. मी या एरंडोल नगरीच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. मला कार्यक्रमाला बोलावल्याबद्दल त्यांनी आभार मानले. त्याआधी महासभा अहवालाचे (स्मरणिका-२०२६) प्रकाशन व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यानंतर महासभेचे कामकाज सुरु करण्यात आले. महासभेचे मागील सभेचे इतिवृत्त श्री देवेंद्र चुनीलाल साळी सहसेक्रेटरी यांनी केले. श्री देवेंद्र साळी यांची महासभेचे प्रभारी सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली. महासभेचे हिशोब पत्रके कोषाध्यक्ष श्री अशोक दिवटे यांनी सादर केले. महासभेने ते मंजूर केले.

**महासभा महाभुषण पुरस्कार :-** महासभा दरवर्षी सामाजिक कार्य करणाऱ्या सेवाभावी कार्यकर्त्यांचा व संस्थांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करीत असते. यावेळी खालील व्यक्तींचा महासभा भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.



**कै. सुर्यकांत (भाई) गोपीनाथ भागवत, मुलुंड यांच्या स्मरणार्थ श्रीमती सुप्रिया सुर्यकांत भागवत, मुलुंड यांच्या सौजन्याने पृष्ठदान.**

१) **श्री तुळशीराम राजाराम साळी** - रा. एरंडोल (सेवानिवृत्त भारतीय सेनादल) भारतीय सैन्यदलातील हा शूर शिपाई दि. ३१-५-२५ रोजी ४० वर्षे देशसेवा करून सेवानिवृत्त झाले. देशासाठी आपले आयुष्य खर्ची घालणारे श्री तुळशीराम हे एरंडोल येथील साळी बांधव असून याचा आपणा सर्वांना, साळी समाजाला अभिमान आहे. अशा समाज व्यक्तीचा श्री तुळशीराम साळी यांचा महासभा भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

२) **श्री देवीदास गणपत खेडकर - सुरत** - श्री देवीदासजी खेडकर हे सुरत येथील ज्येष्ठ कार्यकर्ते असून वयाच्या ७५ नंतरही ते कार्यरत आहेत. आनंद पार्क विभागाचे ते अध्यक्ष असून समाजसेवेसाठी सदैव योगदान देणारे तळमळीचे कार्यकर्ते असून आपल्या प्रगल्भ व स्पष्ट वाणीने, वक्तृत्व शैलीने समाजास मार्गदर्शन करीत असतात त्यांचा महासभेतर्फे महासभा भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

३) **श्री सुरेश गुलाब खंडारे - नाशिराबाद** - श्री साळी संत झिपरुअण्णा महाराज अण्णानगर - नाशिराबादचे रहिवासी असून महासभेचे १९९२ साली धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणी करते वेळी कार्यकारिणी सदस्य होते. नाशिराबाद पंच मंडळ व महासभेसाठी कार्य करणारे जेष्ठ समाजबांधव असून वयाच्या ८० व्या वर्षी समाजप्रती तळमळ व सहकार्य करण्याची त्यांची वृत्ती आहे. त्यांनी आजपर्यंत केलेल्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना महासभा भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे.

४) **श्री ईश्वरलाल एकनाथ साळी (फंड) मुळगाव-चोपडा - रा. डोंबिवली** - सेवानिवृत्त शिक्षक असून डोंबिवली समाजाचे कोषाध्यक्ष, ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजाचे कोषाध्यक्ष व सध्या ते ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित स्वकुळ समाचारचे संपादक आहेत. श्री ईश्वरलाल साळी सेवाभावी वृत्तीचे, मेहनती, हाती घेतलेले कार्य तडीस नेणारे, शिस्तप्रिय असून जबाबदारीने समाज कार्य करणारे व्यक्तिमत्व होय. सुंदर अक्षरांनी त्यांचे लिखाण सर्वांना मोहित करते. योग शिक्षक, क्रिडा शिक्षक असल्याने अनेक खेळासाठी पंच म्हणून ते कार्य करतात. बुद्धिबळ स्पर्धेचे पंच म्हणून ते आजही कार्यरत आहेत. शरीर फिट राहण्यासाठी योगा, आहार याबद्दल ऑनलाईन मार्गदर्शन करीत असतात. समाज सेवेसाठी योगदान देणारे श्री ईश्वरलाल साळी (फंड) यांना एरंडोल महासभेतर्फे महासभा भूषण पुरस्काराने महासभेप्रसंगी गौरविण्यात आले.

५) **श्रीमती मंदाकिनी प्रकाश साळी (धरम)** - महासभेचे दिवंगत ज्येष्ठ समाजकार्यकर्ते श्री प्रकाशभाऊ मंगा साळी यांच्या त्या धर्मपत्नी आहे. सेवानिवृत्त शिक्षिका असून महासभेच्या त्या माजी उपाध्यक्षा आहेत. समाजाच्या कार्यात नेहमी सहभागी होत असतात. डॉ. देवेंद्र प्रकाश साळी महासभेचे सल्लागार हे त्यांचे सुपुत्र असून त्यांचे संपूर्ण कुटुंब समाजाच्या सेवेसाठी योगदान देत आहे. श्रीमती मंदाताई या घर, नोकरी सांभाळून समाजासाठी उत्साहाने कार्य करतात. अशा या सेवाभावी भगिनीस महासभेतर्फे महासभा भूषण पुरस्काराने गौरविण्यात येत आहे.

**६) संस्था पुरस्कार -**

१) **श्री स्वकुळ साळी समाज केंद्र समिती सुरत** - सुरत येथील सर्व विभाग संस्था बरोबर घेऊन केंद्र समिती ही संस्था समाजासाठी कार्य करीत आहे. अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज संस्थेने "आदर्श संस्था" पुरस्कार देऊन गौरविले आहे. दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी केंद्र समितीने सप्तम सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करून ९ वधू-वरांचे विवाह संपन्न केले. समाजाने सेवेसाठी विधायक कामांसाठी कार्य करीत असलेली गुजरात राज्यातील संस्था असुन महाराष्ट्र राज्यातील समाज मनात आदराचे स्थान निर्माण केले आहे. समाजसेवेसाठी नावलौकिक मिळवलेला आहे. अशा या श्री स्वकुळ साळी समाज केंद्र समिती सुरत या संस्थेस महासभेतर्फे विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार केंद्र समिती अध्यक्ष श्री अशोकभाऊ भुतकर व त्यांच्या उपस्थित सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी स्वीकारला.

२) **श्री स्वकुळ साळी समाज लिंबायत विभाग** - सुरत मधील सर्वात जुनी संस्था असून या संस्थेची लिंबायत

मदनपुरा येथे समाजवास्तू असून त्यात श्री जिव्हेश्वर मंदिर व समाज हॉल आहे. समाजसेवेसाठी सदैव कार्यरत असणारी संस्था आहे. या संस्थेचे कार्यकर्ते सेवाभावी असून समाजसेवेसाठी तन मन व यथाशक्ती धन देऊन कार्य करीत असतात. साळी समाजास अभिमान वाटावा असे स्थान त्यांनी निर्माण केले आहे. महासभेतर्फे आदर्श संस्था म्हणून सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार अध्यक्ष श्री अशोक बापू भूतकर, पंच मंडळ अध्यक्ष श्री उल्हास धरम, उपाध्यक्ष श्री राजेंद्र तांबे, माजी अध्यक्ष श्री भरतशेठ नाशिककर व सर्व उपस्थित कार्यकर्ते यांनी स्वीकारला.

३) **श्री स्वकुळ साळी युवा संघटन - सुरत** - येथील समाजातील युवकांची संघटना असून या संस्थेचे अध्यक्ष - श्री मयूर मुरकुटे असून युवा संघटनेचे जवळपास ५० युवक यावेळी महासभेसाठी एरंडोल येथे उपस्थित होते. सुरत शहरातील साळी समाज संघटित करण्याचे काम युवा संघटनेने केले आहे. युवकांचा सहभाग असलेली ही संघटना समाजासाठी सर्वच क्षेत्रात समाज उपयोगी काम करीत आहे. दरवर्षी श्री जिव्हेश्वर करंडक क्रिकेट स्पर्धा भरवित असते. शैक्षणिक, मेडिकल या विभागासाठी वेगवेगळ्या समिती स्थापन करून समाजासाठी कार्य करीत आहे. समाज मनात आदराचे स्थान निर्माण करणारी या युवा संघटनेचा आम्हास अभिमान वाटतो. श्री स्वकुळ साळी युवा संघटन सुरत यांना महासभेतर्फे सन्मान चिन्ह देऊन महासभेत गौरविण्यात आले. उपस्थित सर्व युवा कार्यकर्ते यांनी व्यासपीठावर येऊन हा पुरस्कार स्वीकारला.

५) श्री सुर्यवंशी समस्त स्वकुळ साळी स्थानिक पंच मंडळ ट्रस्ट, एरंडोल. (श्री विठ्ठल मंदिर ) सन १९५३ साली धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडे नोंद झालेली ही समाज संस्था असून या संस्थेचे पुरातन श्री विठ्ठल मंदिर आहे. २५०-३०० वर्षापूर्वीचे पुरातन मंदिर आजही सुस्थितीत आजही उभे आहे. जवळपास १०,००० चौ. फूट संस्थेची जागा असून त्यामध्ये विठ्ठल मंदिर, व सर्व देवतांची मंदिरे व समाजाचा प्रशस्त हॉल आहे. मागील वर्षी श्री विठ्ठल मंदिराच्या बाजूच्या परिसरात नविन मंदिर (श्री गणपती, श्री शिवलिंग, श्री मारुती व संत समाधी) बांधण्यात आले. आमदार निधी मिळवून समाजासाठी जुन्या हॉलला जोडून नवीन प्रशस्त हॉल करण्यात आला. वर्षभर मंदिरात विविध उत्सव कार्यक्रम या मंदिरात साजरे होत असतात. दरवर्षी (एरंडोल येथे) साळी समाजाची महासभा पौष वद्य प्रतिपदेस होत असते. मंदिरासाठी स्वतंत्र पुजारी असून, भक्तांसाठी राहण्यासाठी निवासाची सोय आहे. सर्वांचे श्रद्धास्थान असलेले श्री विठ्ठल मंदिर दर्शनासाठी भाविक येत असतात. समाजास भूषणावह असलेले प्राचीन मंदिर म्हणुन प्रसिद्ध आहे. अशा सेवाभावी संस्थेचा गौरव महासभेने सन्मान चिन्ह देऊन केला व पुरस्कार संस्थेच्या वतीने स्थानिक पंच मंडळ अध्यक्ष - श्री प्रकाश बुधा साळी, ट्रस्टी सचिव - श्री वासुदेव साळी, सौ. क्षमाताई साळी (उपाध्यक्ष), कोषाध्यक्ष - श्री अशोकभाऊ रामरतन साळी, ट्रस्टी - श्री विजय दिवटे, श्री गोविंद साळी, श्री प्रभाकर राऊत, सौ. इंदिराताई साळी, श्री संजय साळी, श्री अरुण साळी तसेच मंदिराचे ट्रस्टी अध्यक्ष - श्री सोमनाथ कासटकर यांनी महासभेतर्फे स्विकारला. यानंतर महासभेचे प्रथम सत्राचे कामकाज संपले. दुपारी १.३० ते ३ वाजेपर्यंत सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

**महासभा दुसरे सत्र** - दुपारी ३ वाजता सुरू झाले. यावेळी व्यासपीठावर श्री उदयकुमार साळी आणि श्री ईश्वरलाल साळी, सौ. शैलजाताई कासटकर, श्री दिलीप राऊत, या मान्यवरांसह संस्थेचे अध्यक्ष श्री कासटकर व महिला मंडळ अध्यक्षा सौ. क्षमाताई साळी, जेष्ठ कार्यकर्ती सदस्या सौ. शोभाताई साळी, उपाध्यक्ष श्री रामचंद्र भुतकर, कोषाध्यक्ष श्री अशोक दिवटे, सहसेक्रेटरी श्री. देवेंद्र साळी इ. मान्यवर होते.

**महासभा शिष्यवृत्तीचे वाटप** - महासभा दरवर्षी परतफेडीची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना देत असते. यावेळी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश देण्यात आले. एकूण ९ विद्यार्थ्यांना रू. ५०००/- प्रत्येकी देण्यात आले.

**गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार** - महासभा दरवर्षी इ. १०, इ. १२ वी, पदवी, डिप्लोमा अशा गुणवंत विद्यार्थ्यांना

रोख पारितोषिके देत असते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तसेच पारितोषिके देण्यात आली.

**महासभा महिला मेळावा -** दुपारच्या सत्रात महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. महिला मेळाव्यात सौ. शैलजा कासटकर प्रांतिक उपाध्यक्षा व एरंडोल महिला मंडळ अध्यक्षा सौ. क्षमाताई साळी यांनी मार्गदर्शन केले. मेळाव्यास बाहेरगावाहून आलेल्या सर्व महिलांचा यावेळी सत्कार करण्यात आला. सर्व महिलांना वाण देण्यात आले. यावर्षी महासभेचे वाण एरंडोल येथील समाज भगिनी सौ. पुष्पलता मुरलीधर डहाके यांनी दिले.

महासभेस अन्नदान देणारे सर्व देणगीदार, शिष्यवृत्ती निधी देणारे, महासभा विश्वस्त निधी, स्मृतिपुष्प व भेटवस्तू देणारे सर्व देणगीरादारांचा महासभेतर्फे सत्कार करण्यात आला.

महासभेतर्फे ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज माजी अध्यक्ष श्री. उदयकुमार लालचंद साळी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. श्री. उदयकुमार साळी हे सेवानिवृत्त झाले असून सेवानिवृत्तीनंतर प्रथमच या कार्यक्रमास उपस्थित राहिले आहेत. समाज सेवेसाठी योगदान देणारे, महासभा व एरंडोल समाज मंदीरासाठी बहुमोल मदत करणारे, सदैव कार्यकत्यांच्यामागे उभे राहणारे आमचे हितचिंतक, सल्लागार आहेत. त्यांचा सन्मानचिन्ह देऊन महासभेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

श्री. सोमनाथ कासटकर, अध्यक्ष महासभा यांनी सभेस उपस्थित राहिलेल्या सर्व समाजबंधू भगिनींचे, बाहेरगावाहून आलेल्या बंधू-भगिनींचे, सर्व देणगीदारांचे, महासभेच्या अहवालासाठी जाहिरात देणारे, महासभा संपन्न होण्यासाठी येथील सर्व कार्यकर्त्यांनी केलेल्या मदतीबद्दल, सुत्रसंचालन करणाऱ्या सौ. क्षमाताई साळी, सौ. शोभाताई साळी, गुणवंत विद्यार्थ्यांची यादी बनवणारे, श्री. पंडित साळी गुरुजी, श्री. संजय सातपुते, सौ. शोभाताई साळी, स्वागत काउंटरवर बसून पावती फाडणारे श्री. किशोर खंडारे, नाना भोगरे, महासभा संपन्न होण्यासाठी सभामंडप, गादी, स्पिकर इ. व्यवस्था करणारे श्री. सचिन साळी व शेवटी एरंडोल येथील ट्रस्टी सेक्रेटरी श्री. वासुदेव साळी व श्री. अशोकभाऊ साळी, श्री अरुण साळी, श्री. फकिरा साळी, श्री विजयभाऊ दिवटे, श्री. संजय साळी, श्री. गोविंद साळी, श्री. प्रकाशभाऊ साळी, सर्व युवा मंडळी, महिला कार्यकर्त्या या सर्वांचे बहुमोल मदतीसाठी, सर्व कार्यकारीणी सदस्य, क्रियाशील समाज कार्यकर्ते व सर्व सहाय्यक मंडळींचे मन :पूर्वक आभार.

आभार प्रदर्शनानंतर महासभा संपल्याचे जाहीर करण्यात आले. जय जिव्हेश्वर.

■ ■ ■

# वासंतिक मेळावा २०२६

**ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज आयोजित वासंतिक मेळावा कार्यक्रम ता. १२ एप्रिल २०२६ रविवार रोजी सकाळी १० ते दुपारी ०३ या वेळेत डोंबिवली येथे साजरा करण्याचे ठरले आहे. या कार्यक्रमात सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल असणार आहे.**

## श्री स्वकुळ साळी समाज केंद्र समिती (सुरत)










जय जिव्हेश्वर...सुरत शहरातील सर्वच समाज बंधु भगिनी वर-वधु व पालक यांना मानाचा मुजरा... संपुर्ण साळी समाजाने आता पर्यंत झालेल्या संपुर्ण समुह लग्नात योग्य असा तन, मन, धनाने प्रतिसाद देऊन सुरत शहरातील समाजाची मान संपुर्ण भारतात उंचावली त्या बद्दल खुप खुप अभिनंदन धन्यवाद.

आमचे सर्वच प्रिय समाज बांधव, आम्ही अध्यक्ष या नात्याने आपले सदैव ऋणी राहणार आहोत. ह्या संपुर्ण कार्यात आज पर्यंत झालेले सर्वच समुह लग्नात फक्त गुजरातच नव्हे तर मुंबई, महाराष्ट्र, कर्नाटक पर्यंत समाज बांधवानी जो प्रतिसाद दिला त्या बद्दल व साळी समाजास चार चांद लावून समाजाची प्रतिष्ठा वाढवली त्या बद्दल खुप खुप आभार. हे एवढे मोठे कार्य एकट्याने शक्य नाही. त्या मध्ये सर्वच समितीचे लहान मोठे दृश्य-अदृश्य कार्यकर्त्यांचा सहकार असतोच. त्यांचे शब्दात वर्णन करु शकत नाही. आम्ही आता पर्यंत झालेल्या समुह लग्नाचे अध्यक्ष, श्री बाळकृष्ण गरुड - ३ समुह लग्न, श्री दिलीप राऊत - ३ समुह लग्न श्री अशोकराव भुतकर- १ समुह लग्न यांचे अध्यक्षते खाली सात समुह लग्न सफल रितीने पार पाडलेले आहेत. ह्या प्रत्येक वेळी समाज बांधवानी आमच्या वर जी जबाबदारी सोपलेली होती ती आम्ही श्री भगवान जिव्हेश्वराला स्मरुन प्रामाणीक पणाने पार पाडलेली आहे. तरी सुद्धा ह्या कार्याचे श्रेय आम्ही समाज बंधुच्या चरणी देत आहोत.

आम्ही सुद्धा समाजासाठी कुठल्याही गोष्टींचा विचार न करता समाजातील वर-वधु पालक यांना योग्य न्याय मिळावा त्या साठी रात्रंदिवस धावपळ करुन फुल नाही तर फुलाची पाकळी समजुन वर-वधुस कन्यादान निमीत्ते जास्तीत जास्त फायदा कसा होईल या कडे लक्ष दिले आणि या पुढेही होणाऱ्या अष्टम समुह लग्नात तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने आम्ही प्रसन्नशील राहणार आहोत.

सबका साथ....समाजका विकास...., आपले सदैव ऋणी व सर्वांचे आवडते

सर्वच अध्यक्ष श्री.

चला तर मंडळी करुया तयारी पुनश्च अष्टम समुह लग्नाची. पुनश्च सर्व युवा वर-वधु पालक समाज बंधु यांना खुप खुप अभिनंदन

**लेखन :- श्री राजेंद्र विष्णु तांबे, समिती-खजिनदार**




**श्री. महेश खंडु कापरे (M.Com)**

**सहसेक्रेटरी ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज**

**Mob.: 9821251973**

**(सेवानिवृत्त अधिकारी-सहाय्यक करनिर्धारक व संकलक, मुंबई महानगर पालिका)**

**६१ व्या**




**शुभेच्छुक**

**ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संस्था**

**व स्वकुळ समाचार परिवार**

## श्री स्वकुळ साळी समाज केंद्र समिती सुरत आयोजित सप्तम सामूकिक विवाह सोहळा २०२५

आज दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ वर रविवार रोजी केंद्र समिती द्वारे सप्तम सामूहिक विवाह सोहळ्याचे सुंदर आयोजन करण्यात आले. हा सामूहिक विवाह सोहळा वस्त्र निर्माती व हिरकनगरी सुरत येथील श्री साई पार्टी प्लॉट मधूरम सर्कल डेंडोली येथे गोरज मुहूर्तावर करण्यात आला.

इतर आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या संपन्न समाजात सामूहिक विवाह होत आहेत. आपला साळी समाज ही प्रगती पथावर आहेच, वैयक्तिक विवाहात होणारे अनावश्यक खर्च टाळणे, समाज कुटुंबावरील आर्थिक भार कमी करणे, आयुष्यभर कर्ज फेडीतून समाज घटकाला सोडविणे हाच कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. एकाच मंडपाखाली संपूर्ण समाज बांधवांचा नऊ वरवधूंना आशीर्वाद मिळवून देणे व त्यामुळे समाजात एकता निर्माण करणे, सामूहिक विवाह सोहळ्यात गरीब श्रीमंत असा भेद नाही हे समाजाला पटवून देणे हाच समितीच्या भगीरथकार्याचा समाजाला संदेश.

| | वर | वधु |
|---|---|---|
| 1 | **चि.यश**<br>श्री.दिपक देविदास बुलबुले<br>यांचे द्वितीय सुपुत्र, डिंडोली,सुरत | **चि.सौ.कां.कशिश**<br>श्री.योगेश नामदेव साकरे<br>यांची जेष्ठ सुकन्या, उधना,सुरत |
| 2 | **चि.कौशल**<br>श्री.बाळकृष्ण वसंत खंडारे<br>यांचे जेष्ठ सुपुत्र, अहमदाबाद | **चि.सौ.कां.नयना**<br>स्व.हरीष देविदास बुलबुले<br>यांची जेष्ठ सुकन्या, डिंडोली,सुरत |
| 3 | **चि.राजु**<br>श्री.यशवंत भास्कर जगताप<br>यांचे जेष्ठ सुपुत्र, सचिन, सुरत | **चि.सौ.कां.पुजा**<br>श्री.पांडुरंग त्र्यंबक डहाके<br>यांची जेष्ठ सुकन्या, डिंडोली, सुरत |
| 4 | **चि.अभिषेक**<br>स्व.हितेश मधुकर चित्तेवान<br>यांचे जेष्ठ सुपुत्र, छापरा भाटा, सुरत. | **चि.सौ.कां.किर्ती**<br>श्री.अशोक मधुकर आहिरे<br>यांची सुकन्या, आनंद पार्क,सुरत |
| 5 | **चि.योगेश**<br>श्री.सुरेश पांडुरंग कुऱ्हे<br>यांचे सुपुत्र, आनंद पार्क, सुरत | **चि.सौ.कां.दिपिका**<br>श्री.गणेश जानकीराम साळी<br>यांची सुपुत्री, आनंद पार्क, सुरत |
| 6 | **चि.विजय**<br>श्री.सुकलाल वना साळी (काळे)<br>यांचे सुपुत्र, डिंडोली, सुरत | **चि.सौ.कां.निकिता**<br>श्री.रविंद्र नारायण साळी(घोडे)<br>यांची सुकन्या, भेस्तान, सुरत |
| 7 | **चि.यश**<br>श्री.मंगलेश किसन धरम<br>यांचे सुपुत्र, आनंद पार्क, सुरत | **चि.सौ.कां.अर्चना**<br>श्री.अशोक रमेश वाघेला<br>यांची सुपुत्री, आनंद पार्क, सुरत |
| 8 | **चि.धवल**<br>स्व.नितिन गांडाभाई मोरे<br>यांचे सुपुत्र, वेसु, सुरत | **चि.सौ.कां.मनिषा**<br>श्री.अनिल सोमाभाई भंभाळे<br>यांची सुपुत्री, वेसु, सुरत |
| 9 | **चि.हर्षद**<br>श्री.राजेंद्र शंकर अढाव<br>यांचे सुपुत्र, उधना, सुरत | **चि.सौ.कां.कविता**<br>गं.भा.कुसुम विठोबा बागडे<br>यांची सुपुत्री, उधना, सुरत |

सप्तम सामूहिक विवाह सोहळा २०२५ मध्ये खालील जोडप्यांनी सहभाग घेतला. हा विवाह सोहळा संपूर्ण वैदिक मंत्रोच्चार, सप्तपदी पद्धतीने समाजाचे माननीय व सुपरिचित ब्राह्मण श्री प्रकाश कुलकर्णी महाराज यांच्या हस्ते संपन्न झाला.

सप्तम सामूहिक सोहळ्यात समाजाचे प्रतिष्ठित पाहुणे श्री सोमनाथ जी कासटकर अध्यक्ष महासभा एरंडोल, श्री उदयकुमार नाशिककर माजी अध्यक्ष ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज, सौ शैलजाताई सोमनाथ कासटकर अध्यक्ष ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज, उपाध्यक्ष अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज, सौ. संगिताताई उदयकुमार नाशिककर उपाध्यक्ष ठाणे जिल्हा, श्री उमाकांतजी अक्कडकर अध्यक्ष अखिल गुजरात स्वकुळ साळी समाज, श्री मोहनराव लोणकर सचिव अखिल गुजरात स्वकुळ साळी समाज यांनी मानाचे स्थान भूषविले.

श्री सुधाकर भाऊ चौधरी नगरसेवक डेंडोली भाजप, श्री दिपक कुमार मगनलाल लाहोरकर उद्योगपती, श्री पंकज मनोहर सोनी श्री ज्वेलर्स, श्री डॉक्टर लीलाधर आर वंडीकर मेडिकल सुपरिटेंडंट, श्री अनंत कुमार पीठे, श्री हरिश मस्के, श्री प्रकाश चोपारे, श्री मिलिंद एकबोटे, श्री राजेन्द्र भंडारे, श्री सोमनाथराव, श्री राजेन्द्र लोणकर, श्री हेमंत वाझट, श्री शैलेष चौधरी, श्री अशोक वखारे, श्री विजय खंडारे, सौ सविता अक्कडकर, सौ भारती भंडारे, सौ. भारती अनंत चौधरी, श्रीमती छायाताई रमेश घोलप, श्री कैलास जगताप, श्री संजय जगताप वगैरे पाहुण्यांनी उपस्थित राहून नव वरवधूंना आशीर्वाद दिलेत.

सप्तम सामूहिक विवाह सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे या सोहळ्यात लक्झरीयस पार्टी प्लॉटवर नऊ वर वधूंचे लग्न लावून देण्यात आले. राजकीय/माळी समाज कार्यकर्ते श्री सुधाकर भाऊ चौधरी यांनी हा संपूर्ण सुविधांयुक्त पार्टी प्लॉट आपल्या समाजाला अर्ध्या भावात म्हणजे ५०% डिस्काऊंट वर उपलब्ध करून दिला. श्री परेशभाई पटेल युनिक कन्स्ट्रक्शन चे मालक यांनी प्रत्येक वधूला सोन्याचे एक पेंडल, महावस्त्र, श्रृंगार कीट आशीर्वाद स्वरूपात कन्यादान निमित्त दिले. समितीला रुपये ५१ हजार रोख देणगी दिली. श्री दीपक कुमार मगनलाल लाहोरकर यांनी प्रत्येक जोडप्याला गोदरेजचे एक कपाट दिले. श्री लक्ष्मी ज्वेलर्स चे मालक सोनू भाऊ यांनी प्रत्येक नववधूला सोन्याची नथ दिली. श्री पंकज मनोहर सोनी श्री ज्वेलर्स यांनी रुपये ३१ हजार देणगी दिली. श्री परेशभाई लाड यांनी सुरुची भोजनासाठी संपूर्ण तांदूळ व तुरीची डाळ देऊन समितीला सहाय्य केले. लग्नपत्रिकेत छापल्याप्रमाणे इतरही मान्यवरांनी समाजाला विविध रोख देणगीअन्नदान देणगी देऊन समाजाला मदत केली.

विवाह सोहळ्यात नऊ नवरदेवांची घोड्यावर शोभायात्रा काढण्यात आली. श्री दिलीप भोगरे यांनी डीजेची मोफत सेवा देऊन समितीला सहाय्य केले. सामूहिक विवाह गोरज मुहूर्तावर सायंकाळी सात वाजता संपन्न झाला. समाज बांधवांनी भोजनाचा शिस्तप्रिय पद्धतीने आस्वाद घेऊन समाजापुढे उदाहरण सादर केले. श्री संजय चांदोळे यांनी रसोईया श्री अशोक मोदी यांनी भोजनाची व्यवस्था चांगल्या रीतीने सांभाळली. त्यात श्री संजय बुलबुले यांनी साथ दिली. स्वरुची भोजनाचे मुख्य आकर्षण म्हणजे भोजनाची सुमारे ४५० किलो मिठाई मोहनथाळ केंद्र समितीच्या सर्व कार्यकर्त्यांनी दोन दिवस अगोदर मदनपुरा लिंबायत स्थित श्री जिव्हेश्वर मंदिरात बनवून घेतली.

सप्तम सामूहिक विवाह सोहळ्याची लग्नपत्रिका छापण्याचे कार्य श्री दिलीप राऊत, राजेंद्र तांबे, दीपक लाडके अशोक मेंद्रे सहित अशोक भुतकर यांनी पार पाडले. विविध बॅनर श्री दिलीप राऊत यांनी छापून घेतले.

विवाह सोहळ्यात संगीत संध्याचे प्रथमच आयोजन करण्यात आले होते. श्री उदय कुमार नाशिककर, श्री ईश्वरलाल फंड वगैरे सर्व कलाकारांनी अप्रमित गीतांचं सादरीकरण केले. कार्यक्रम अविस्मरणीय बनविला. सर्वांचे खूप धन्यवाद.

कुमारी जान्हवी दिघे यांनी त्यांच्या सहकलाकारांसह श्री गणेश वंदना व स्त्री जीवन चरित्र नृत्यातून अप्रतिमरित्या सादर केले त्यासाठी त्यांना श्री राजेंद्र भिंगारे गुरुजी यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे सुत्र सौ स्मिता अमित कुमार तगारे मुंबई, सौ किरण मनोज भोगरे, श्री अशोक नामदेव मेंद्रे सहित श्री राजेंद्र विष्णू तांबे यांनी उत्तमपणे सांभाळली.

श्री स्वकुळ साळी समाज केंद्र समिती चे अध्यक्ष श्री अशोक भुतकर, माजी अध्यक्ष श्री दिलीप राऊत, सेक्रेटरी श्री अशोक भुतकर, माजी अध्यक्ष श्री दिलीप राऊत, सेक्रेटरी श्री अशोक मेंद्रे, खजानची श्री राजेंद्र तांबे, श्री दीपक लाडके कमिटी अध्यक्ष श्री विलास गरुड सहित श्री भरत नाशिककर श्री रामचंद्र भुतकर, श्री उल्हास धरम, श्री योगेश भोगरे, श्री संजय चांदोळे, श्री रत्नाकर साखरे, श्री गणेश खंडारे, श्री राजेंद्र भोगरे, श्री दिगंबर भोगरे, श्री देविदास खेडकर, श्री संजय दिवाने, श्री अंकलेश कोरडे श्री शरद लाहोरकर, श्री राजेंद्र राऊत, श्री गणपत काळे, श्री रमेश वाझट, श्री रमेश सातपुते, श्री आनंद सातपुते, श्री राजेंद्र बुलबुले, श्री किरण भंबाळे, श्री राजु सदाफळे, श्री मुकेश काळे सहित सर्व कार्यकर्त्यांनी समितीला विविध दान मिळवून दिले

**विशेष आभार** : श्री केंद्र समिती हस्तक विविध महिला मंडळांचे अध्यक्ष सौ आशाताई गरुड, सौ वर्षाताई गरुड, सौ रेखाताई काळे, सौ रेखाताई दातरंगे, श्रीमती पद्माताई भुतकर, सौ उषाताई वाव्हळ सहित सर्व महिलांनी त्यांची जबाबदारी चोख बजावली.

श्री साळी समाज युवा संघटना चे अध्यक्ष मयुर मुरकुटे सहित श्री जितू मुरकुटे, श्री संतोष भिंगारे, श्री नितीन काळे श्री सुनील बुलबुले, श्री शुभम राजीव हरीशेत कन्हे, श्री राजेश मडके सहित सर्वच युवा कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशासाठी सवांनी मदतीची पराकाष्ठा केली. सर्व नव वरवधूं व त्यांचे पालक सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागा बद्दल विशेष आभार, समितीला अनमोल सहकार्य केले. सर्वाचे खूप खूप आभार धन्यवाद, जय जिव्हेश्वर...

**आपलाच श्री राजेंद्र विष्णू तांबे**

## सांजवेळ !

वयाची सत्तरी जवळ यायला लागली आणि मनात विचार येऊ लागला की आता वानप्रस्थाश्रम सोडून संन्यासाश्रमाकडे वाटचाल सुरु करायला हवी. ह्याची पहिली जाणीव त्या दिवशी झाली. दाराची बेल वाजली. दार उघडलं तर दारात सामान घेऊन वाणी उभा. मी म्हटलं, "अरे, आम्ही तर यादी दिली नव्हती!" तो म्हणाला, "सकाळीच तर वहिनीसाहेब यादी देऊन गेल्या" तो सामान ठेवून निघून गेला. ही पहिली वेळ होती जेव्हा सुनेनं माझ्याशी चर्चा न करता वाण्याला महिन्याच्या सामानाची यादी दिली होती. सामानातही खूप बदल झाला होता गव्हाच्या ऐवजी तयार आट्याची पाकिटं आली होती. तेलही बदललं होतं. तुकडा बासमतीऐवजी अख्खा बासमती आला होता. त्या दिवशी ठरवलं,

आता स्वयंपाकघराचा मोह सोडून तिथून बाहेर पडायचं. त्यात लुडबुड करायची नाही. बाहेर बसून भाजी निवडणं वगैरे एवढीच मदत करायची. दुसऱ्या दिवशी रविवार होता. मुलगा म्हणाला, "आई, उद्या आम्ही सर्व जण सिनेमाला जातो आहोत. तुझं पण तिकीट काढणार होतो, पण त्या थिएटरला पायऱ्या खूप आहेत. तुला त्रास होईल म्हणून तिकीट काढलं नाही." तो म्हणाला ते खरं होतं. अलीकडे पायऱ्या चढताना खूप दम लागायचा. त्या दिवसापासून जाणवलं, आता नाटक, सिनेमा ही मनोरंजनं बंद करायला हवीत. घरातच टीव्ही, फोन, वाचन ह्यात मन रमवायला हवं! नात पार्टीला गेली होती. खूप उशीर झाला होता. एक वाजत आला होता. माझ्या डोळ्याला डोळा लागेना. तिची काळजी वाटत होती. तिचे आईवडील शांत होते. ती आल्या आल्या मी म्हटलं, "अगं, किती उशीर" पण माझं वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच ती म्हणाली, "अगं आजी, मी आईबाबांना सांगून गेले होते, मला उशीर होईल म्हणून. तू कशाला एवढी काळजी करतेस ?"

तिच्या त्या 'तू कशाला एवढी काळजी करतेस ?' ह्या वाक्यानं मला जागं केलं. खरंच, तिची काळजी करायला तिचे आईवडील समर्थ आहेत. मी कोण तिची काळजी करणारी ? माझा काय संबंध ? त्या दिवसापासून ठरवलं, भावनांना आवर घालायचा. कशातच गुंतायचं नाही. "**तुका म्हणे उगी राहावे। जे जे होईल ते ते पाहावे**" घरच्या आघाडीवर अशी हळूहळू निवृत्त होत असताना शरीरानंही वृद्धत्वाची जाणीव करून द्यायला सुरुवात केली होती.

पहिला नंबर लावला पायांनी ! जरा जास्त वेळ उभं राहिलं की पाय भरून यायला लागले. चालताना किंवा बसल्यावर एवढं जाणवत नव्हतं, पण उभं राहिलं की त्रास होत होता. शॉपिंगला किंवा कुठे समारंभाला गेलं तर चटकन कुठे बसायला जागा मिळते का ते बघायला लागले. हळूहळू शॉपिंग, समारंभ हे बंदच केलं. रस्त्यावरून चालण्याचा आत्मविश्वास कमीकमीच होत गेला. कुणीतरी सोबत असावं असं वाटायला लागलं. आणि मग बाहेर जाण्यावर बंधनंच आली.

नंतर जाणीव करून दिली दातांनी ! दात दुखत नव्हते, पण त्यांचे तुकडेच पडत होते. म्हणून डेंटिस्टकडे गेले. त्यांनी खालचे सर्व दात काढायला सांगितले. ते दात काढून नवीन बसवण्यात दोन महिने निघून गेले.

हे दोन महिने खाण्याचे फार हाल झाले. अगदी खूप शिजवलेलं किंवा पातळ खाणंच खाता येत असे. त्याचा तब्येतीवरही परिणाम होत होता. कवळी बसवल्यानंतरही ती सेट होईपर्यंत खूप त्रास झाला. कवळी घातली की हिरड्या सोलवटायच्या. शेवटी एकदाची ती कवळी सेट झाली पण तेव्हापासून अन्नाची चवच गेली !

जास्त वेळ बसलं की पाठ आणि कंबर दुखायला लागली. ह्या साऱ्यामुळे माझं जगच आक्रसून गेलं. एरवी सगळीकडे बेधडक वावरणारी मी, पायाच्या दुखण्यामुळं शॉपिंग, समारंभ बंद झाले. एकटी जाण्याचा आत्मविश्वास कमी झाल्यामुळं रस्त्यावर जाणंच बंद झालं.

मी आता कॉलनीतच फेऱ्या घालू लागले. पण तिथंही एक दिवस चालताना ठेच लागली आणि पडता पडता वाचले. त्यामुळे तोही आत्मविश्वास गमावला. खाली जायची भीती वाटायला लागली. शेवटी माझी खोली, माझा पलंग आणि मदतनीस ठेवलेली बाई एवढंच माझं संकुचित जग झालं. बाहेर कुठं जायची दगदग नकोशी वाटू लागली.

वृद्धत्व जवळ जवळ येत होतं पण त्यातही काही सोनेरी क्षण येतात, जे मनाला उभारी देऊन जातात. मुलगा ऑफिसमधून लवकर घरी येतो. आल्यावर माझ्या खोलीत येतो. पलंगाजवळ खुर्ची घेऊन बसतो आणि माझी चौकशी करतो.

"आई तू बरी आहेस ना? गोळ्या नीट वेळेवर घेतेस ना? वेळच्या वेळी जेवत जा. व्यायाम कर."

त्याचे हे प्रश्न अगदी साधे असतात पण त्यातल्या आपुलकीच्या स्पर्शाने माझं मन आनंदाने भरून येतं.

एक दिवस रात्री जेवताना सून म्हणते, "आई, तुम्हाला पोळी चावताना त्रास होतो ना? मी रात्री तुमच्यासाठी घावन करत जाईन. चावायला सोपं आणि पचायलाही हलकं!"

तिची ही काळजी मनाला हळुवार स्पर्श करून जाते! चष्मा लावून गोळ्यांची नावं वाचताना नात तिथं येते आणि म्हणते, "आजी तुला गोळ्या रोज शोधाव्या लागतात ना? दर रविवारी मी आठवड्याच्या गोळ्यांच्या पुड्या करून ठेवत जाईन. हिरव्या पुडीतल्या गोळ्या सकाळी लाल पुडीतल्या रात्री घ्यायच्या. ते तुला सोपं होऊन जाईल." गोष्ट साधीशीच पण मन भरून येणारी!

नातवाचा वाढदिवस दुसऱ्या दिवशी असतो. तो म्हणतो, "आजी ! तुझा शिरा खूप सुंदर होतो. उद्या माझे मित्र येणार आहेत. तू शिरा करशील?" दुसऱ्या दिवशी जास्त वेळ उभं न राहता येणाऱ्या माझ्या अंगात दहा हत्तीचं बळ संचारतं आणि मी शिरा करते. तो कसा झाला ह्यापेक्षा, नातवानं करायला सांगितलं ह्याचाच आनंद फार मोठा असतो!

मार्केटमधून येताना सून तीन गाऊन्स घेऊन येते. म्हणते, "आता घरात साडी नका नेसत जाऊ. पायात येते. पडायला होईल. घरात हे गाऊन्स घालत जा. घालायला सोपे आणि सुटसुटीत!"

तिनं दाखवलेली काळजी मनाला भिडते! एके रविवारी मुलगा म्हणतो, "आई तू घराबाहेर जाऊ शकत नाहीस% आज आपण लाँग ड्राईव्हला जाऊ या. तुलाही बाहेर पडल्यावर बरं वाटेल."

आम्ही सगळेच बाहेर पडतो. खूप दिवसांनी भेटलेला बाहेरचा निसर्ग मनात भरून घ्यावासा वाटतो!

अशा आंबटगोड आठवणी जागवताना मनात येतं, खरंच आता किती थोड्या अपेक्षा उरल्या आहेत. घरातल्या कुणीतरी रोज खोलीत येऊन आपुलकीनं फक्त कशी आहेस, असं विचारावं

सुनेने रोजचं जेवणाचं ताट मदतनीस बाईबरोबर न पाठवता एखाद्या दिवशी स्वतः घेऊन यावं. जवळ बसावं. चार गोष्टी बोलाव्यात

नातवंडांनी वेळ मिळेल तेव्हा जवळ बसून तुटलेल्या बाहेरच्या जगातल्या चार गोष्टी सांगाव्यात आजारी पडल्यावर कुणीतरी येऊन कपाळावर नुसता हात ठेवावा सांजवेळ. ही हुरहूर लावणारी असते. आयुष्याची सांजवेळही अशीच हुरहूर लावते. गतायुष्यात केलेल्या चुका आठवून देणारी, छोट्याशा अपेक्षा पूर्ण व्हाव्यात, असं वाटायला लावणारी

**... अशी ही सांजवेळ!** **संकलीत**

## महासभा एरंडोल कार्यकारणी सभा संपन्न ०१ मार्च २०२६

**एरंडोल -** एरंडोल येथील श्री विठ्ठल मंदिरात श्री सूर्यवंशी समस्त स्वकुळ साळी समाज मंडळ (महासभा) या संस्थेच्या कार्यकारी मंडळाची सल्लागार मंडळ, क्रियाशील समाज कार्यकर्ते यांची एकत्रित सभा संपन्न झाली. सन २०२३-२८ या कालावधीची कार्यकारणीस मान. धर्मादाय आयुक्त सो. नाशिक यांची मंजुरीचे आदेश प्राप्त झाले. या सभेत महासभेचे विश्वस्त कै.अरुणभाऊ शिवदास डहाके यांचे ०४ डिसेंबर २०२५ रोजी निधन झाल्याने त्यांच्या रिक्त जागी नशिराबाद येथील सेवानिवृत्त शिक्षक **श्री.बंडू रूपचंद खंडारे कार्यकारणी सदस्य** म्हणून यांची एक मताने निवड करण्यात आली तसेच महासभेचे सचिव कै.श्री अरुणभाऊ डहाके, सचिव यांचे जागी चोपडा येथील समाज कार्यकर्ते व विद्यमान कार्यकारणी सदस्य **श्री राजेंद्र तुळशीराम साळी (बुलबुले) यांची सचिव** म्हणून एकमताने निवड करण्यात आली. यावेळी महासभा अध्यक्ष श्री. सोमनाथ र. कासटकर यांनी महासभा ०४ जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाली त्यांचा जमा खर्च सभेत सादर केला.

या सभेसाठी महासभा कोषाध्यक्ष श्री अशोक दिवटे, उपाध्यक्ष श्री रामचंद्र भुतकर, सल्लागार श्री दिलीप राऊत, श्री विलास गरुड सुरत यांचे सह सर्व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. हि सभा संपन्न होण्यासाठी एरंडोल ट्रस्टी सचिव श्री. वासुदेव साळी, ट्रस्टी कोशाध्यक्ष श्री. अशोक साळी, श्री. विजय दिवटे यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

**महासभा सेक्रेटरी :- श्री राजेंद्र तुळशीराम बुलबुले, चोपडा**

॥ श्री जिव्हेश्वर प्रसन्न ॥ माता अंकिनी-दशांकिनी प्रसन्न ॥

# ८० वा वाढदिवस



स्वकुळ वैभव

## श्री. डी. जी. निमकर

# नाबाद ८०

### दि. २ मार्च (होळी पौर्णिमा) २०२६ रोजीच्या ८०व्या वाढदिवसानिमित्त श्री. डी.जी.निमकर यांचे अभिष्टचिंतन !

आपल्याला सुखसमृद्धी, निरामय आयुष्य आणि उत्तम आयुरारोग्य लाभो ! आयुष्यमान भव !
शतायू व्हा ! जीवेत् शरद शतम् !

**शुभेच्छुक**

सौ. दीपश्री निमकर, कु. ऋत्वा निमकर, श्री. लक्ष्मीकांत निमकर, सौ. उमा निमकर

लायन श्री. चंद्रकांत हावरे, अध्यक्ष, स्वकुळ साळी ज्ञातिगृह, श्रीक्षेत्र आळंदी.

स्वकुळ साळी समाज, ठाणे
स्वकुळ साळी समाज, अंबरनाथ
ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित 'स्वकुळ समाचार'
स्वकुळ साळी ज्ञातिगृह, श्रीक्षेत्र आळंदी
श्री गणेश मंदिर ट्रस्ट, रानवली (जि. रायगड)
जागतिक साळी फाउंडेशन
श्री दत्तमंदिर देवस्थान मंडळ, कुडली (तरीबंदर)

ॐ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा । ॐ

अक्षरधारा,इचल./9922968525

## ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ साळी समाज उल्हासनगर आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिर





।। जीवेत शरद: शतम्।।

सौ रत्नप्रभा प्रल्हाद लिंगे व श्री प्रल्हाद तुकाराम लिंगे यांना
लग्नाच्या ५० व्या वाढदिवसा निमित्त (दि. २५ मार्च २०२६)
आणि
श्री. प्रल्हाद तुकाराम लिंगे (साळी) यांच्या पंच्चाहत्तरी निमित्त
हार्दिक शुभेच्छा

## शुभेच्छुक

सौ. धनश्री - श्री सचिन प्रल्हाद लिंगे (सुन - मुलगा)
सौ. अर्चना - श्री बबनराव गोरडे (मुलगी - जावई)
सौ. स्वाती - श्री श्रीकांत खरड (मुलगी - जावई)
सौ. जागृती - श्री प्रशांत पेंढारकर (मुलगी - जावई)
नातवंडे - प्रणव, प्रांशू, देवश्री, देवेश, पिहिका, आराध्य, श्रावणी,
तनुश समस्त लिंगे, गोरडे, खरड, पेंढारकर परिवार व आप्तेष्ट

# हार्दिक शुभेच्छा

निवास : विद्युत कॉलनी, म्हसावद रोड, एरंडोल ४२५१०९
मोबा. 9421520074 / 7039915737

# श्री सुर्यवंशी समस्त स्वकुळ साळी समाज मंडळ एरंडोल, महासभा बहात्तरी २०२६



# किमया इन्फोटेकच्या उद्यमी लता काकू यांचा
## ७५ वा वाढदिवस (अमृत महोत्सव)














**शुभेच्छुक : किमया इन्फोटेक, पुणे**

**श्री राजेश कृष्णाथ एकबोटे, सौ. रूपाली राजेश एकबोटे,**
**श्री. सागर राजेश एकबोटे कु. मैत्रेयी राजेश एकबोटे श्री. मंगेश कृष्णाथ एकबोटे,**
**सौ. दीपाली मंगेश एकबोटे श्री. परम मंगेश एकबोटे, श्री. तेजस मंगेश एकबोटे,**
**समस्त एकबोटे, राऊत, सपार, साखरे, वैद्य, ढगे परिवार**

**If undelivered please return to:**

**Jan.+Feb. 2026**

**Swakul Samachar**

**Editor - Mr. Ishwarlal E. Sali (Fand)**
B-304, Channur Bhuvan CHS,
G. Gupte Road, Vishnu Nagar,
Dombivli (West) - 421 202.

या अंकात व्यक्त केलेल्या मताविषयी संपादक सहमत असतातच असे नाही .... संपादक

To,

Printer & Publisher Mr. Barsu R. Sitafale on behalf of Thane Jillah Swakul Sali Samaj Printed at Laxmi Printers, 4. Mohini Soc., Anand Nagar, Dombivli (W) Dist. Thane - 421 202 Published at:B/303, Rutuvrat Co-op.Hsg.Soc.,Anand Nagar, Dindayal Rd., Near Indrayani Hospital, Dombivali (W), Dist. Thane-421 202

Editor :- Mr. Ishwarlal E. Sali

RNI No. MAHMAR/2014/57230